# आंदण

(प्रासंगिक कवितासंग्रह – भाग २)


रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)



मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**आंदण** (प्रासंगिक कवितासंग्रह - भाग २)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
भ्रमणध्वनी - ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट-२, कवितांच्या बागेसमोर,
ज्योतीनगर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस, वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे - ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : ज्येष्ठ शु. ३, शके १९४६,
रविवार, दि. ०९ जून, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, एन-१, सिडको, छत्रपती संभाजीनगर - ४३१००३.
भ्रमणध्वनी - ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 978-81-972636-6-8

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : ₹ **१५०/-**

कविता या कवयित्रीचे स्वयं सर्जन असून कविता तयार झाल्यानंतर तिच्या सोबत वापरण्यात आलेले चित्र हे केवळ साहित्यिक आनंदासाठी वापरण्यात आलेले आहे. यात कुणाचाही कॉपीराईट भंग करण्याचा मुळीच हेतू नाही. या सर्व कवितांचा उद्देश भाषेचा प्रसार व प्रचार इतकाच आहे.

# समर्पण



**ज्या माझ्या सर्वात मोठ्या व अतिशय भोळ्या भाबड्या**
**स्वभावाच्या मामाने माझ्या आईच्या मनात**
**सदैव आदरपूर्ण प्रेमाचे स्थान कमावले,**
**ज्याने कधीच कुणाला दुखावले नाही**
**अशा शिक्षक असलेल्या**
**कै. गोपाळराव रामचंद्र बोर्डे**
**यांच्या पावन स्मृतींस हा प्रासंगिक काव्यसंग्रह**
**सादर समर्पित!**

# मनोगत

कवीचं जीवन हे कधीच रसिकांचं होऊन जातं, ज्यावेळी त्याच्या हातून रसिकांना भावणारं काव्य उतरत जातं. त्याचा आणि रसिकांचा एक ऋणानुबंध घट्ट होत जातो. सुरुवातीला हळूहळू विणत गेलेले हे धागे नंतर इतके पक्के होतात की त्यात हक्काचा सुवास दरवळू लागतो. वेगवेगळे प्रसंग येतात त्यावेळी मग रसिकांना यावरती आपल्या लाडक्या कवीने, कवयित्रीने कविता लिहून द्यावी असे भाव उमटू लागतात. त्यांना तसं वाटणं साहजिकही असतं आणि म्हणूनच कधी कुणाची निवृत्ती असेल, कोणाचा जन्मदिवस असेल, कोणाचे सुखद अथवा दुःखद क्षण असतील, संयोग, भेटीगाठी, वियोग असेल तर त्या निमित्ताने अशा प्रकारे केल्या गेलेल्या काव्यारचना या प्रासंगिक सदरात मोडतात.

अनेकवेळेला रसिकांची अशीही इच्छा असते की आज त्यांच्या आवडीच्या एखाद्या नट-नटीचा, अभिनेता वा अभिनेत्रीचा जन्मदिवस आहे आणि त्या निमित्ताने त्या अभिनेत्यावर, त्या अभिनेत्रीवर काव्य लिहिल्या जावे. तशाही प्रकारच्या रचना मग माझ्या हातून होत गेल्या.

कधी कधी सणवार आणि विशिष्ट दिनाच्या निमित्ताने त्या दिवसांचं, त्या सणांचं महत्त्व सांगणाऱ्या, अधोरेखित करणाऱ्या कविताही रचल्या गेल्या.

प्रसंग म्हणजे आयुष्याचा अविभाज्य घटक असतो. अनेक सुंदर सुंदर प्रसंगांनी आयुष्याच्या या छान छान घटना ठळक होत जातात आणि म्हणूनच त्या त्या प्रसंगांना रचल्या गेलेल्या ह्या कविता म्हणजेच ते प्रसंग सजीव करणे, ठळक करणे असंच ठरतं. माझ्या लेखणीतून अशा नानाविध प्रसंगी रचल्या गेलेल्या अनेक कविता या काव्यसंग्रहाच्या माध्यमातून पुन्हा रसिकांपर्यंत पोहोचवताना अतिशय आनंद होत आहे.

प्रसंगवशात् जन्माला आलेल्या कविता त्या प्रसंगांना दिमाखदारपणे मोठं करत गेल्या. कधी कुणाच्या मनात आपुलकीचा झरा वाहवत गेल्या तर कधी सणाचा गोडवा वाढवत गेल्या. कधी सेवानिवृत्तीच्या निमित्ताने आपले कृतार्थ भाव प्रकट करत गेल्या, कधी जन्मदिवसाच्या शुभेच्छा शब्दांनी भेट देत गेल्या. हे सारे प्रसंग कवयित्री म्हणून माझ्या मनाला स्पर्शून गेले, आपलेसे होत बाहेर आले आणि म्हणूनच ते कधी वेगळी प्रसंग असे वाटलेच नाहीत.

या प्रासंगिक कवितांचा हा काव्यसंग्रह म्हणजे भिन्न भिन्न प्रकारच्या अनेक फुलांचा जणु पुष्पगुच्छ आहे जो रसिकांच्या हाती देत त्यांच्या आशीर्वादाची कामना करते.

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# प्रस्तावना

आमची मानसकन्या डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी हिच्या प्रेमळ आग्रहाखातर तिच्या या काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहिण्याचे करीत आहे.

वास्तविक तिच्या आधीच्या मराठी, संस्कृत, साहित्यसेवेबद्दल काय सांगावे? असा कोणताही विषय नाही ज्यावर तिचे साहित्य नाही. पुणे येथून स्नातक व स्नातकोत्तर व टिळक महाराष्ट्र विश्वविद्यालयामधून सर्वप्रथम स्थान मिळवल्यावर अमरावतीहून विद्यावाचस्पती व महाराष्ट्र लोकसेवा आयोगातून संस्कृत विषयात सर्वप्रथम येण्याचा बहुमान मिळवला आहे.

गत बावीस वर्षांपासून संस्कृत विषयाच्या प्राध्यापिका व महाराष्ट्र शासनात राजपत्रित अधिकारी हे पद भूषवत आहे.

सर्वात कौतुकाची बाब म्हणजे मराठी, संस्कृत, हिंदी साहित्य निर्मिती शिवाय तिची अजून ओळख म्हणजे ती एक उत्कृष्ट वक्ता, व्याख्याती, प्रवचनकर्ती, निवेदिका सूत्रसंचालिका, एकपात्री प्रयोगकर्ती अशा नानाविध रूपात सर्वांगीण योगदान आहे.

तुळजापूरला जन्म झालेल्या या चतुरस्त्र कन्येला भवानी मातेकडून दैवी आशीर्वाद मिळालेला आहे. त्यामुळे तिची प्रत्येक साहित्य निर्मिती पूर्णपणे प्रतिभासंपन्न आहे.

प्रस्तुत संग्रहात प्रत्येक काव्य हे निसर्गाच्या वेगवेगळ्या रूपात तिला जाणवलेल्या, उत्स्फूर्तपणे, सहज शब्दांतून प्रगट झालेले आहे व तशीच अनुभूती काव्य वाचताना रसिकांना जाणवते व पटते.

प्रत्येक कवितेमधे अत्यंत चपखलपणे वापरलेले शब्द त्याच्या शीर्षकासोबत असलेले चित्र खरोखरच सुंदर व योग्य आहे.

सौ. मंजूषाच्या कविता अत्यंत साध्या, सोप्या, सरळ शब्दात असतात. काही कविता सुरावटीवर गुणगुणाव्या अशा पण आहेत. क्लिष्टता कुठेच नाही,

संभ्रम कुठेच नाही, केवळ आनंद - निसर्गसौंदर्य, शब्दात टिपून, मनातले भाव बरोबर समजेल अशीच रचना असते. तत्काळ आशय कळतो. गूढता, क्लिष्टता नाही. उलट सोप्या शब्दांमुळे कवयित्रीच्या हळुवार व आंतरिक भावना व्यक्त होऊन -

शेवटी असे म्हणावेसे वाटते की, काव्यसंग्रहाला किंवा पुस्तकाला कोणत्याही प्रस्तावनेची शिफारस नसावी. वाचकाला प्रत्यक्ष कविता वाचल्यावरच कवयित्रीची डायरेक्ट ओळख व्हावी व त्यावरच आपले मत, आपली आवड ठरवावी हे उत्तम.

असेच अभिजात, सहज व सुंदर साहित्य निर्मिती सौ. मंजूषाच्या हातून सदैव होत राहो ही मन:पूर्वक शुभेच्छा व खूप खूप अभिनंदन व उत्तमोत्तम आशीर्वाद.

**श्रीकांत ह. चिकेरूर**
निवृत्त बँक अधिकारी, नागपूर

# अनुक्रमणिका


१) संसाराचा वेलू ... ९
२) एक अनामिक हात ... १०
३) आषाढस्य प्रथमदिवसे ... १२
४) रम्य एक स्वप्न ... १४
५) मेघ होऊनी ... १५
६) दिलखुलास सौंदर्य ... १६
७) दीपदादा दीपदादा ... १८
८) भारतमातेचा शिरपेच ... २०
९) सालस सौंदर्याची देवता ... २२
१०) संसाराची सुरुवात ... २४
११) रंगभूमी ... २६
१२) चेहरा की ... २८
१३) तू रेखा सौंदर्याची ... ३०
१४) तेजदीप होऊ या ... ३२
१५) जन्मदिनाच्या गोड शुभेच्छा ... ३३
१६) माय ही माझी मराठी ... ३४
१७) अजून तू तिशीतली ... ३६
१८) दिवा पेटवू एक एक ... ३८
१९) शंभर नंबरी सोने ... ३९
२०) रानात आज सारं ... ४०
२१) अंदमानी यमराजही थकला ... ४२
२२) पिनू ... ४४
२३) व्रतवैकल्ये साधना ... ४६
२४) रस्ताच एक आस ... ४८
२५) अश्विन वद्य चतुर्दशी ... ५०
२६) श्रीमंती कशाची ... ५२
२७) अश्विन वद्य त्रयोदशी ... ५३
२८) संक्रांती ही शुभा होऊ दे ... ५४
२९) अविरत चाले साधना ... ५६
३०) जीवेत् शरदः शतम् ... ५७
३१) माझी मायबोली ... ५८
३२) असे वेगळा प्रवास ... ६०
३३) हास्य विलसते मुखी ... ६१
३४) ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी ... ६२
३५) राहे हर्षद कुशल ... ६३
३६) विवाह असतो दोन जिवांचा ... ६४
३७) पुस्तकांची कांती ही ... ६६
३८) दुःख बोलके वसुंधरेचे ... ६७
३९) अक्षयोऽस्तु शुभं सर्वम् ... ६८
४०) महाराष्ट्रा ऽऽऽऽऽदेशा ... ६९
४१) तू तेज 'अंश' प्रचंड ... ७०
४२) त्यागी असतो वंद्य निरंतर ... ७१
४३) उडू दे ग्रंथातून पाखरे ... ७२
४४) अक्षय आशीष देवा तुझा ... ७४
४५) अनंत अवकाशातून आली ... ७५
४६) हा चंद्र अमृताचा ... ७६

४७) वर दे शारदे ... ७८
४८) गुरू म्हणजे सर्ग ... ८०
४९) योगा मानले जगाने ... ८१
५०) मंजूषा ... ८२
५१) चरित्र ... ८३
५२) लाजण्याची तुझी अदा ... ८४
५३) शरदाचं हे चांदणं ... ८५
५४) वरदान तुला तारुण्याचे ... ८६
५५) गुरुचरणांनी आश्रय दिधला ... ८७
५६) पुस्तक मित्रा ... ८८
५७) तेजदीप ... ८९
५८) मीच नव्याने जगते ... ९०
५९) ध्वज उन्नत फडकून जावा ... ९२
६०) तू माणूस रे भला ... ९३
६१) पणजी आज्जी पणजी आज्जी ... ९४
६२) भारतभूची जयगीते गायिली ... ९५
६३) हिंदू ऽऽऽऽऽ ... ९६
६४) स्मृतिसंपदा पूर्ण भरीन ... ९७
६५) मुकुंदायन ... ९८

## (१)
## संसाराचा वेलू

संसाराचा वेलू
सोनियाच्या गगनावरी
सुख दुःखाचे हिंदोळे
परी पुष्पे आली बहरु!!

पूजा ऐसी केली नित
देव पाहिला जनात
एक निष्ठा हो अंतरी
ईश वसे जनांतरी!!

सोन्यासारखी माणसे
जोडीयली या जीवनी
काय सांगावा हो मोद
सार्थ झाली ही अवनी!!

मातीच्या संसाराचे
आज सुवर्णची झाले
अन संतती ही रत्ने
यश नभी चमकले!!!

समाधानाची लकीर
आज भाळी कोरलेली
माझी लक्ष्मी साथीला
आनंदानं भारलेली!!!

नको काही विठुराया
काय मागावे मी तुला
मोक्ष मिळावा म्हणून
द्यावा परमार्थ झुला!!!

असे जीवन वहावे
समाजाच्या कार्यापायी
माझी पाऊले चालावी
मातृभूमीच्याच ठायी!!!

दि. सप्टेंबर, २०१९
श्री. प्रवीण घुगे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोग
यांच्या विनंतीनुसार त्यांच्या
माता-पित्याच्या लग्न वाढदिवसाच्या
निमित्ताने



## (२)
## एक अनामिक हात

एक अनामिक हात
सदा जाणवे पाठीशी
माझ्या यशामागे आहे
माझ्या बापाची पुण्याई

राब राब राबला हा
जन्मभर आम्हासाठी
तरी विरक्त साधुसा
श्रेय न घेण्यासाठी

वाड वडिलांची तोच
वहात असे जिम्मेदारी
सारी कर्तव्ये करून
शांत समाधानी घरी

भाकरीची जी किंमत
त्यानं समजावली की
आजही मिळवता
कधी ओंजळ ना रिती

शिकवण ऐसी दिली
त्यानं जगायाला बळ
त्याला पाहता मिळतं
साऱ्या पुण्याईचं फळ

देवा, तूच दिसतोस
त्याच्या रुपात आम्हाला
आयुरारोग्य मिळू दे
शांती समाधान त्याला

कर्म ऐसे गा करावे
डोळे त्याचे चमकावे
लेकरांच्या यशातून
त्यानं सफल गा व्हावे

सेवा त्याची बा करावी
नको अन्य देवपूजा
जन्मभरी राबलेला
कोण त्याच्यावानी दुजा

बाबा, हसलास तू की
माझं जगणं हसंतं
दुःखात तुझ्याशिवा
कोणी सोबती नसंतं

त्याच्या सुरकुत्या देती
साक्ष अनुभवाची की
मन अजून हळवं
पोटंच्या पोरांसाठी

त्याचं मन गा चिंततं
सुख लेकराबाळांचं
नाही मागितलं त्यानं
काही सवताच्या कामाचं

असा बाप मिळायाला
काय करावं लागतं
आम्ही तेच करू देवा
जन्मोजन्मी हे सांगतं

त्याच्या पायाशी भेटतो
विठुरायाचा गा लळा
त्याच्या कष्टाचा लावावा
भाळी चंदनी गा टिळा

दि. ६/१२/२०२३
रात्री ००:२७



## (३)
## आषाढस्य प्रथमदिवसे

ज्येष्ठ कसा बसा सरता
आषाढाची आस ओली
मेघदूती आरंभाला
आषाढानं गर्दी केली

आषाढस्य प्रथमदिवसे
कालिदासी शब्द फुलले
यक्ष विरहाच्या व्यथांना
हृदय कविवरे भुलले

असे प्रेम, पत्नी ऐशी
कुबेराचा चाकर रमला
मुकूलित कमळकळ्या ह्या
तोडुनी निशीसमयी आणल्या

शिवपूजा करता दंश कराला
कुबेर वाणी शाप बोलला
संवत्सरभर दूर प्रियेला
तू रामगिरीवर जा तळमळण्या

दिसामागुनी दिस ढकलूनी
यक्ष काकूळतीला
जीव प्रियेचा कोमेजलेला
तरेल मम संदेशी भला

दिसला दिसला नभात मोठा
मेघ गिरीवरी बघ झुकला
दूत बनवूनी याला आता
मार्ग सांगण्या नच थकला

इथून तेथे तिथून कोठे
ऐक कसे जायचे
हिमालयी बघ अलका नगरी
संदेशा तिथे न्यायचे

नयनरम्य सौंदर्य सृष्टीचे
न्याहाळत तुजला जाणे
परी टाळ सख्या तू
अधिकसमया कुठेतरी रेंगाळणे

नद्या, पर्वते, प्रदेश, नारी,
महाकालेश्वर दरबारी
जाता जाता दृष्टिसुखाने
विसरू नये जिम्मेदारी

अलकानगरी उदास झाली
उदास माझी प्रिया बावरी
तिला जाऊनी बोल सांगूनि
वहिनीस सावरी खरोखरी

सांग तिला मी तुझ्याविना
तुझ्याच साठी जगतो ना
कंकण माझे गळते खाली
चित्र रेखिता झुरतो ना

शाप कोठडी चार मासाची
कशी बशी तू घालव ना
निद्रेतून देव उठतील जेव्हा
असेन तिथे मी तुजजवळी ना

गोष्ट एवढी, व्यथा केवढी
मेघदूताने मांडियली
काव्यशक्ती ही कालिदासाची
भावफुलांनी सांडियली

विप्रलंभ शृंगारशालूने
काव्यकामिनी गहिवरली
कालिदासाची पाहून प्रतिभा
आषाढ यक्षिणी सावरली
आषाढ यक्षिणी सावरली

दि.२/६/१९
दुपारी २.५१ वा

## (४)
## रम्य एक स्वप्न

रम्य एक स्वप्न ते
आजही खुणावते
मिटुनी लोचने प्रिया
मोद मी दुनावते

विश्व ते असे खरे
की स्वप्न भास वाटते
कणा कणात आजही
प्रेम तेच साठते

तू खरा सांग कुठे
त्या तिथे की या इथे
स्वप्नमार्ग चालते
की सत्य स्वप्न भासते

मी अनादी मी अनंत
त्याच स्वप्नी जागते
जागताच सारी माया
मोक्षपथी लागते

जागेपणी झोपणे अन
झोपताच जागणे
दे रे प्रिया माझ्या राया
मुक्ती हेच मागणे

विश्व असे स्वप्न की मी
जागता न जागते
जागले आता तुला न
अन्य काही मागते

एकरूपता अशी की
मी तुझ्यात  वाहिली
कृष्ण वाटे राधिका नि
राधिका स्थिरावली

जन्म असे चक्र की
तू चक्र तेच रेखिले
मी देऊनी तुला मला
कृष्णरूपी देखिले

आज स्वप्न भंगले की
भंगली ही वासना
तुझ्या विना तनामनास
अन्य काही आस ना

दि. १३/०६/२०१९
सकाळी ०९.४३ वा.



## (५)
## मेघ होऊनी

मेघ होऊनी दूत बोलल्या
भावप्रीतिच्या धारा
हृदयामधला मंद वाहिला
संस्कृतातुनी झरा

प्रेमकाव्य हे अतुल्य ऐसे
कवी न त्यासम दुसरा
कालिदासाच्या आषाढातून
नित्य वसंतही हसरा

भुलले मन भुलली सृष्टी
विरहप्रीतीची गाथा
देववाणीच्या शब्दप्रभूपुढे
नमवू अवचित माथा

६/१२/२०२३,
००:३३



## (६)
## दिलखुलास सौंदर्य

दिलखुलास सौंदर्य
ती लावण्याची राणी
वय सरते ना कधीही
ती तारुण्याची गाणी

वय ओसरते की येते
ते भरात वारंवार
त्या ब्रह्मालाही वाटे
कृतिकौतुक अपरंपार

तो मदन शिवाच्या शापे
जरी भस्मसात की झाला
अनंग प्रियेला पाहून
रतीमय जणू होऊन गेला

ही सुंदरता की चुरशी
रतीहून देखणी मूर्ती
कामदेव भस्म की होतो
पण मनात जन्मा येतो

हे हास्य लाघवी ऐसे
डोळ्यात तेज ते फाके
ओठात देखणे जगणे
मजसी भाळी ते रेखिणे

ती रेखा की भाग्यश्री
उधळून मोती हास्यश्री
कुठून माधुरी इतुकी
ती हेमांगी की मधुश्री

मज वाऽऽटे त्या वयाने
भाळून तिजवर केले
हे प्रेम असे जाहीर की
ते असर सोडूनि वागे

वय वाढत नाही केव्हा
ते थिजुनी बंदी झाले
तिथेच ते अडकोनी
जायबंदी स्वतःच झाले

ती सुटका नकोच त्याला
ना वृद्धत्त्वाचे भाले
तिजसवे गुंगले वयही
ते उलटी पाऊले चाले

मनमुराद ती जगताना
धडपडते सारखे कोणी
वय वयात येण्यासाठी
बंदिस्त तिच्या कोंदणी

मी झुरतो अजुनी येथे
जरी जयासवे सारखा
मी जगणे हरवून बसलो
ती तेजांगणीची रेखा

ती आजही तिथेच राहे
तारुण्याने लवलाहे
मी वृद्ध ज्येष्ठसा झालो
तिज नयनी तरुणच आहे
तिज नयनी तरुणच आहे

दि.१०/१०/१९
सायं ६.५५ वा.



## (७)
## दीपदादा दीपदादा

दीपदादा दीपदादा
अवस तुझी आली
दीपाराणीही बघ ना कशी
सजून धजून बसली

दोघेही आज जरा
ताजेतवाने दिसताय
निवांत बसा बरं
आज कशाला कष्ट घेताय

तुम्ही दिवा नि पणती
दीपक अन समई
किती भूमिका न
रूपही वेगवेगळी

आज किनई
आई म्हणाली
दिव्यांना धन्यवाद
द्यायचेत सायंकाळी

त्यांना स्वच्छ
अंघोळ घालून
नवे वस्त्र
नेसायला देऊन

सगळे दिवे
लावायचेत
तुलाही बाळा
त्यांच्यासारखेच
तेजाळायचेय

मग आईबरोबर
मीही तुमची आरास केली
रांगोळी काढून पाटावर
तुम्हाला बसायला जागा दिली

तुमची पूजा केली
नैवेद्य दाखवला अन
आईने तुमची
कहाणी ऐकवली

मला खूप खूप
आवडलात तुम्ही
तुमच्यामुळेच तर
प्रकाशमान झालोत आम्ही

आता माझी तुमची
घट्ट मैत्री झालीय
तुमच्यासारखाच प्रकाश देत
मी जगायची प्रार्थना केलीय

तुमचा प्रकाश तुमचं तेज
मिळू द्या आम्हाला
स्वतः जळून इतरांना
सुख देणं कळू द्या आम्हाला

दिवा आणि ज्योती
सदैव राहो संगती
जीवनाचे सगळे क्षण
तुमच्यामुळेच रंगती

आई म्हणते हात जोड
त्यापुढे दिव्य जे जे
म्हणून म्हणतो देवा आज
दीपज्योति नमोस्तुते
दीपज्योति नमोस्तुते

दि. ३१/७/१९
रात्री ८.४३ वा



## (८)
## भारतमातेचा शिरपेच

भारतमातेचा शिरपेच
अभिमानाने उंच झाला
एक तुरा जो स्वर्भुमीचा
पुन्हा तिचा तिला मिळाला

किती वर्षांची आस तिची
ती वाट पाहुनी थकली होती
निधड्या छातीच्या पुत्रांनी
व्यथा तिची ती जाणली होती

तिच्या मस्तकी घाव घणांचे
षंढ रिपुर्डे घालीत होते
छिन्नविच्छिन्न शिरातून ते
रुधिर तियेचे चिळकांडत होते

चर्रर्र करतसे मातृप्रेमाने
देशभक्त पुत्रांच्या हृदयी
फितूर काही लचके तोडीती
लांडगे बरे इतुके क्रूर असुरी

किती कथा किती व्यथा
सदपुत्रांच्या त्या क्रूर हत्या
लढवैय्ये सैनिकबाळे बघ
रोज देतसी प्राण आहुत्या

आपुल्या मुलुखातून, घरातून
अन्यायाने परके केले
अत्याचाराच्या जखमा त्या
भळभळून जीविते सांडले

गुलाम तिजला करण्यासाठी
सर्प विषारी चावा घेई
कधी तिच्यावर पोसलेला
अजगर तिजला गिळण्या पाही

स्वर्ग असूनही शापित भूमी
राजकारणे झाली होती
क्षणोक्षणी संततिरक्ताने
रडून रडून ती न्हाली होती

किती दिसांनी आज माऊली
आनंदाने माखून गेली
धीर धीटशा तिच्या मुलांनी
राजकारणी बाजी मारली

प्रतिमा उजळळी राजकारणी
स्वार्थ बरबटीत जा पाताळी
देशभक्तीच्या धमन्या वाही
नवोत्साहाचे रुधिर प्रवाही

हसली गाली कश्मीर ल्याली
मुक्त स्वतंत्र वसन मल्मली
किरीटी तिच्या रत्न जडविले
भारतमाता खरी स्वतंत्र झाली

तिच्या पाऊली फुले पसरली
पदस्थळी मखमल अंथरली
तिचीच भूमी तिला वाहिली
कृतार्थ तिजला आज पहिली

ती अखंड राहो, अभेद्य राहो
चला पुन्हा वीरबाणा आणू
नवी तुतारी राजकारणी
बलशाली तिजला करुनी दावू

हिंदुस्तानी तेज आमुचे
पुन्हा नव्याने उजळून जाईल
प्रजा न राजा एक होऊनी
मातृभूमी उत्कर्षा नेईल

दबल्या इतिहासाला बदलू
पुन्हा तुझे जे तुजला देऊ
प्रणाम माते घेशी आमुचा
तव स्वप्ना पूर्णत्वा नेऊ

दि.६/८/१९
सकाळी ९.५१ वा.



## (९)
## सालस सौंदर्याची देवता

सालस सौंदर्याची देवता
स्त्रीहृदयाची मूर्त करुणता
वत्सलतेची मधुर ममता
हुरहूर देते तुझी सांगता

अलौकिक बुद्धी तीक्ष्ण वक्ता
मतीमती ती, अतुल्य सुषमा
राजकारणी नीतिमत्ता
हुरहूर देते तुझी सांगता

प्रजाजनांशी नाळ घट्ट ती
विदेशनीती दृढवाक्य ही
शब्दांचे भाले भिरभिरता
हुरहूर देते तुझी सांगता

विचारसक्षम नेतृत्वाची
जनप्रिय प्रियजन नेता होती
प्रखरतेजमयी संसदपटुता
हुरहूर देते तुझी सांगता

विदुषी ऐसी सभा गाजवी
वक्तृत्वे रिपूदलही लाजवी
सामान्यांची समजते व्यथा
हुरहूर देते तुझी सांगता

प्रसन्न आभा मुखी विराजित
सुषमा स्वयं कांती स्वराजित
सूर्य नव्याने उगवत असता
हुरहूर देते तुझी सांगता

ज्या स्वप्नास्तव जीव झिजविला
अमितमोदे हर्ष पसरला
स्तुतिसुमनांनी कौतुक करता
हुरहूर देते तुझी सांगता

याच क्षणाची वाट पाहिली
भारतमाता कश्मीर ल्याली
जीवनध्येय सुफळ पाहता
हुरहूर देते तुझी सांगता

क्षण तो कौतुकवर्षावाचा
सहकाऱ्यांच्या कर्तृत्वाचा
उदारचित्ते लिहिता लिहिता
हुरहूर देते तुझी सांगता

सूक्ष्म सुषमा होणे नाही
गरिमा ऐसी लाभणे नाही
देश जाहला किती पोरका
हुरहूर देते तुझी सांगता

दि.७/८/१९
सकाळी ७.५७



## (१०)
## संसाराची सुरुवात

हिरव्याकंच डोंगरात
वाट नागमोडी
लालपरी गावोगावी
माणसांना सोडी

नाती अशी जपते ती
कुठूनही वाट काढी
पाचु भरल्या रानामंदी
चढतेना ती पहाडी

लाल राणी हिरवी गाणी
माणसांची हौस
खिडकीतून डोकावून
झेलत्याती पौस

उंच उंच झाडीतून
शान तिची भारी
मोकळ्या या रस्त्यावर
दौड दरबारी

जंगलाचा वाघोबाही
तिला निरखतो
आपणही बसावे का
सपान पाहतो

लालपरीमंदी बसून
मारू या रपेट
टपावर चढुनिया
पाहणीच थेट

वाघोबाचं सपान
लाल लाल झालं
तेवढ्यात गाडीनं
पलायन केलं

गावोगावी फिरणारी
माणसांना जोडणारी
निसर्गाच्या कुशीतून
पुढं पुढं धावणारी

नातं तुझं माझं भारी
ऐक ना गं लाल परी
वऱ्हाड तुझ्या संगतीनं
नवरी आली माझ्या घरी

संसाराची सुरुवात
तुझ्यामुळ गोड झाली
माणसांना जोडणारी
परी अशी अजोड झाली

दि.१३/८/१९
सकाळी ८.५४ वा.

## (११)
## रंगभूमी

रंगभूमी रंगात न्हाऊनी
नवरस सारे तनी भिनऊनी
किती भावना किती भाव हे
कृतार्थ आजही त्या प्रकटवुनी

नाट्य जगावे, नाट्य हसावे
नाट्य रडावे, क्षण पकडावे
नाटक पुढती, तयारी मागे
रंगभूमीवर जुळती धागे

वसन भरजरी आयुष्याचे
विणले जाते बहु कष्टाने
क्षणाक्षणाची भावमनाची
तलम वीण साधून नाट्याने

तो नट असतो की आपण
प्रतिबिंबाचे मनदर्पण
कायिक वाचिक अभिनयाला
हळव्या मनाचे समर्पण

अंक अंक गुंफूनचि येता
अजोड काही अमूल्य काही
जगण्यासाठी रत्न देतसे
नित्यनिरंतर ही रंगभूमी

एक विचार होई सोहळे
तासांमध्ये जन्म आकळे
सारे सारे प्राण ओतुनी
जन्मा येते रूप वेगळे

हे नाट्य असे की जगणे माझे
रंगभूमी की जीवन सारे
क्षणात रसिका घेऊन जाते
नाट्य मनातील बोलून जाते

नाट्य कुणाचे रचणाऱ्याचे
की ते अभिनित करणाऱ्याचे
दिग्दर्शक, संगीतकाराचे
अथवा असंख्य राबत्या करांचे

नाटक या साऱ्या साऱ्यांचे
ज्यासाठी त्या रसिकवरांचे
त्याहून अधिक ते जिथे नांदले
प्रत्येक मनीच्या रंगभूमीचे

रंगभूमी ही बहरत असते
कालपटली ती विहरत असते
ध्येयामधुनी या साऱ्यांच्या
नित्यनवी साकारत असते

ती अजरा, ती अमरा
कालजयी प्रेक्षक नजरा
कळा सोसुनी जन्मा घालीत
नाट्य होतसे उजळ चेहरा

रंगभूमी की प्रयोगशाळा
नवजन्माचा रोज सोहळा
रंगभूमी ही ऐशी माता
नाट्यकोंब उरी जन्मे कोवळा

रंगभूमी, तू सारे काही
क्षणाक्षणाचे नाते होई
तू मी, मी तू, परागकण
मनात फुलते अत्तरबन

जगणे मरणे रंगभूमी
सवय चांगली रंगभूमी
रक्त धमणीचे रंगभूमी
आत्मतत्त्व हे रंगभूमी

श्वास गुंफणे रंगभूमी
आस गुंतणे रंगभूमी
संचिताचा न्यास देखणा
रंगभूमीपुढे स्वर्ग ठेंगणा

मी जन्माला येईन जेव्हा
रंगभूमी वा नाट्य होण्याला
भावधुमारे लेऊन सारे
साक्षी होईन या सोन्याला

दि.०६/११/१९
सकाळी९.३७ वा.

## (१२)
## चेहरा की

चेहरा की दर्पणातील
मनभावनांचे बिंब हे
मी राखिले मज यौवनाला
चेहरा की तारुण्य हे

राखणी देहाची आणिक
साधना कलोपासना
पेशीपेशी प्रेरणेच्या
वाहती नित आस ना

मी दटावत राहिले
मज यौवनाला सारखे
सोडणे जागा न तू तव
मज ना होणे पारखे

मी तुला जपण्यास सारे
मांडले बघ ना पसारे
झिजवुनी वेळा या माझ्या
गीत आळविले पुकारे

कौतुकाने जग ना थकले
समवयस्क ते सारे वाकले
डोळ्यात माझ्या वसशी तू
मी तुला केले की धाकले

वय वया रे कोवळ्या तू
अजुनी माझे स्वप्न की
साथ किंचित सोडण्याला
आता नाईलाज ही

चेहऱ्यावर विणशी आता
नाजुकशा या रेघोळया
सुरकुत्या त्या अजून नाही
धार अनुभवी बोलक्या

भांडणे जे जुनेच होते
दबलेले आजवरी मनातून
तरुणपण मोठे की जाहले
जाहले सान वृद्धपण

वाटण्या केल्या बघा की
आज थोडया उभयतांनी
भाव तरुणी अल्लडाचे
काही अनुभव बांधणी

मीही हसले गाली खुदकन
अन मना समजावले
येऊ दे त्याचेही मजवर
प्रेम होते जे दाबले

वाट त्या वाढत्या वयाने
पाहिली किती पाहिली
आज थोडी या कपोली
जागा त्याला मी वाहिली

वृद्ध झालेल्या वया रे
ऐक ना माझे जरा
तुही युवा होऊन मजसवे
थोपवून ठेव ही जरा

एवढी नसू दे त्वरा
काळ की हा भोवरा
मी दिला चकवाच त्याला
तुही थोडा बावरा

थांब हं थोऽऽऽडा जरा
काळ होई हा साजरा
संधिवेळा बिलगु दे मज
मुखडा असू दे लाजरा

दि.२८/११/१९
सकाळी ६.४३ वा.



## (१३)
## तू रेखा सौंदर्याची

तू रेखा सौंदर्याची तुजला
चिंता नसावी वार्धक्याची
ईश्वर ही रचतो तुरळकशी
काळासाठी रेष धोक्याची

म्हणून तर दबकत दबकत तो
चोरपाऊली अडखळतो
उंबरठ्यावर तुजला ठेवत
आक्रमणापासून पळतो

इतरांशी बघ कसा निर्दयी
प्रभाव दाखवतो सत्वर
तुझ्याशी मात्र पाठशिवणीचे
खेळ खेळतो तो सत्तर

मला वाटते तुला पाहुनी
गुंगून जातो तोही खरा
देण्या येतो वार्धक्याला
तारुण्याची विणतो जरा

डोळ्यांमधल्या सागरातुनि
नौका त्याची हडबडते
वाणीही जणू मूक होऊनी
ऐन वेळेला गडबडते

तोच लिहितो मग कवने तुझ्यावर
सौंदर्याच्या देवीचे
आरती, पूजा, व्रतवैकल्ये
मधुर सूक्तेही भावीचे

हिसकावून तो घेईल कैसा
तारुण्याच्या खाणाखुणा
रसिक आहे तो तर कधिचा
काळपुरुष केवढा जुना

युगायुगातून भट्टी जमते
रूप रूपावर वरचढ ठरते
एका जादुई हास्यामधुनी
झरे वाहूनी नद्यांस भरते

तो काळ उभा जरी पुढती जाण्या
पाऊले त्याची अडखळती
येतो हिरावून घेण्यासाठी
पण तारुण्याची नदी खळखळती

तोच अचंबित घडते ऐसे
अकल्पित जे काहीतरी
विसरून वय तुझे मोजण्यासाठी
रेघारेघोट्या गालावरी

नकोस चिंता करू कशाची
यौवनखणी तू राणीही
गणिते चुकती हिशोब फसती
विधीही केविलवाणीही

जरी वळ्या दोनचार त्या दिसल्या
मलमल देही सुंदरशा
अधिकच सुंदर दिसशील तू तर
रेखा विद्युल्लता नशा

दि.१३/०१/२०२०
रात्री ९.२३ वा



## (१४)
## तेजदीप होऊ या

तेजदीप होऊ या चला
आज अवस दिव्यांची आली हो
घासून, पुसून, उजळून त्यांना
रत्नदीप पेटवू अहो

कन्या पुत्रे दिवे वंशाचे
त्यांना सद्गुण तेज मिळो
अंधारदुर्गुण दूर पळविण्या
लख्ख प्रकाश हेची बळ मिळो

सारे सारे दिवे घेऊनी
आज तयांना लख्ख करा
आपुल्या जीवनी तम जो पसरला
प्रेरणा घेऊन ज्योत बना

तिन्ही सांजेला पाटावरती
समया निरांजन सजवू या
लामणदिवेही चमकुन उठतील
तेजप्रकाशे उजवू या

तेजाची पूजा ही संस्कृती
आपुली भारतमातेची
तमोगुणाला दूर सारण्या
सात्विक श्रावण आणण्याची

अपेयप्राशन अभक्ष्यभक्षण
भूतदयेला होते विसरून
अभय देत चला सत्त्व सांभाळू
खरा धर्म देऊ पसरून

निसर्गाशी बघा घट्ट आपुले
नाते जडते सणोत्सवातून
परंपरा खरी श्रेष्ठ आपुली
जपू तिला आपुल्या कृतीतून

शरीर दिवा हा मानून आपुला
मळभ निराशा दूर करू
ध्येयज्योत प्रज्वलित करण्या
कष्टतैल मग त्यात भरू

चला पेटवू दिवा दिव्याने
मानवदीप असे उजळू
त्यांच्या प्रकाशे सांजसमयी या
तमासही तेजात पाजळू

दि. ३१/७/१९
सकाळी ९.५१ वा.



## (१५)
## जन्मदिनाच्या गोड शुभेच्छा

किती देऊ मी जन्मदिनाच्या
गोड शुभेच्छा तुजला
लहान असुनी मार्गदर्शिका
पदोपदी तू मजला

उत्तम आई दो बाळांची
पत्नी तू आदर्श
तुझ्या सद्गुणांचीही शिदोरी
मनास करते स्पर्श

हिम्मत केवढी उरात घेऊन
शूर अहिल्या होशी
घरादाराला उत्कर्षाप्रत
सेवेने तुझ्या तू नेशी

होतील साऱ्या मनोकामना
निश्चित पुऱ्याही आणि
असशी धाकटी लाडाची तू
आमुची शोनाराणी

दि.१५/०१/२०२०
सकाळी ८.४१ वा.




## (१६)
## माय ही माझी मराठी

माय ही माझी मराठी
शब्दमंजुळ गोरटी
ऐकू बोलू लिहू नि वाचू
शब्दरूपे गोमटी

अक्षरांनी जन्म दिधले
शब्द पोटी वाढले
वाढवाढुनी वाक्य सार्थक
भावनांनी साजले

वाक्यवाक्यांच्या कथा
निर्माण होती आगळ्या
कादंबऱ्या ओव्या नि कविता
लेऊनी ललिता सुधा

शारदेची रूपे सुंदर
ग्रंथरूपे देखणी
प्राप्त होता की कृपा
मग लिहिती होते लेखणी

संवत्सरे धेनूसहस्र
अमृताची धार स्त्रवली
संतमुखी ओव्या अभंगी
साऱ्या प्रकारा पावली

ही मराठी, पोशिले की
काव्य सारे सहज ते
गद्यपद्यातून येथे
नाट्यरंगही निपजते

मी मराठी माय माझी
ही मराठी साजिरी
शब्द बोलू कौतुके की
रसिक झेलती सत्वरी

आजही संमेलने अन
उत्सवांच्या दिंडोऱ्या
पुस्तकांच्या गावी जाऊन
घेते मनही धांडोळ्या

गद्यपद्यातून मोती
सांडले स्वातीतले
गंध चंदनी हे मराठी
आजही मातीतले

ती सदा स्वर्गीय मोदे
नाचते हृदयांतरी
माय म्हणतो आम्ही तिजला
वसते ती नित अंतरी

शब्द बुडतो अमृताते
कर्णतृप्ती साधते
माय देते स्तन्य मधुर
जन मराठी पोसते

भाग्य ऐसे लाभण्याला
पुण्यराशी पाहिजे
हीच भाषा जन्मोजन्मी
संचितातून राहीजे

दि.२५/०२/२०२०
सकाळी ६.५१ वा.



## (१७)
## अजून तू तिशीतली

अजून तू तिशीतली
नाही वाटंत
त्रेपन्नी तुझी झाली बघ
नाही पटंत

रूप तुझे मोहिनी
तू गजगामिनी
पुण्य केले श्रीरामी
तू त्याची संगिनी

काय तुझे हास्य ते
अजोड निखळ
देव तुझ्या हास्यासाठी
करती तळमळ

अप्सराच घडविली
तुला त्या ब्रह्मयाने
पुण्य केले कोणी
आणले तुज धरेवरे

बांधा असा बांधला
न पुन्हा कोणाचा
हेवा किती करावा त्या
खुळ्या नयनांचा

नृत्य तुझे बोलती
अंगोपांगही
रोमरोम नाचते
दंग होऊनी

बोल मधुर रम्य अधर
कान तृप्तही
तू कुणीच नाही परी
सर्वस्व लुप्तही

नाव तुझे ठेविले जे
अर्थ लाभला
शब्द मधुर तव स्पर्षे
मध भरलेला

माधुरी तू सांग कुणा
नाही गे उरी
आजंही तू स्वप्न जणू
मृगजळापरी

तरीही रोज पाहतो
तुझी अशी छबी
जपली तुला करून
काळजाची ही डबी

येतेस स्वप्नातील या
माझ्या मंदिरी
वावरतेस होत माझी
लाडकी सजनी

तूच गोडवा तूच गोजिरी
नाही तुझ्यासम गं कुणी
माझी माधुरी, तू माझी माधुरी
तुझ्याविना जिंदगानी आहे अधुरी

प्रिये मधुर माधुरी
अमृताहूनी वरी
अतुल्य साजिरी
मूर्त गोजिरी

दि.२२/०५/२०२०
रात्री १०.३१ वा.



## (१८)
## दिवा पेटवू एक एक

दिवा पेटवू एक एक
चेतवून अंतःकरणाला
विष विखारी विषाणूतले
दहन पुरेपूर करण्याला

आज भीतीचे सावट दाटच
आत पसरला अंधःकार
उगा वाटते बळी का जाईल
इथे मानवी ज्योत विकार

एक विषाणू माज माजला
दैत्य बनून प्रलयंकारी
चाहूल ही ना देतो तो तर
आहे गहन कटकारस्थानी

धैर्य ढळू ना देऊ आपण
राजा घालतो ऐशी साद
एक दिवा बघ पेटवू निशीला
मनात जिद्द उमटे प्रकाश

दीप लावणे मात ही ठरते
शत्रूसंगे लढण्याची
एक तेज सागर होऊन मग
लहर उसळते चैतन्याची

असू दे संकट आले दारी
एक दिवा तो जळेल द्वारी
पवित्र अग्निमध्ये जळू दे
कोरोना अन भीती सारी

दि.०५/०४/२०२०
दुपारी १.०२ वा.



## (१९)
## शंभर नंबरी सोने

शंभर नंबरी सोने हास्य हे
कसे विलसते आहे श्रीमुखी
कसले संकट कसली गरिबी
घास सोन्याचा घालते मुखी

काही तरी म्हणे घडले आहे
उघडे घरही पडले आहे
जमेल तेवढे पाठीवरती
घेत गावी मग चालणे आहे

अन्न न पाणी गाठीशी काही
किती कोस ते जाणे आहे
मजूर माझी माय राबते
बाप राबतो सदाच आहे

एक छोटूला भाऊ माझा
आई दुधावर वाढत आहे
आज न काही तिने खाल्ले तरी
बाळ उपाशी कसा न राहे

आता कुणीतरी पुण्य मिळविण्या
पंगत आमुची वाढली आहे
त्या दाण्यादाण्यातून मजला
चव भुकेची कळली आहे

अशी मजुरी पोटासाठी
वणवण भटकंती ही आहे
तरीही जगणे किती हे सुंदर
सुंदर इथली माती आहे

या मातीशी नाती आमुची
गावकुसाची एक झोपडी
दाणा नाही तिच्यात तरीही
प्रेमभरे वाट पाहे बापुडी

कसली आली महामारी ही
लोक महाली रडणारी
रस्त्यावरती घर आमुचे
तरीही आम्ही ना कुढणारी

जाऊ चालत दूरच्या घरी
अर्धीच खाऊ तिथे भाकरी
म्हणून रडणे नाही मंजूर
हसणे हरवील कोरोनाही

दि.२३/०५/२०२०
दुपारी २.२३ वा



## (२०)
## रानात आज सारं

रानात आज सारं
बंद बंद बंद आहे
रान आपल्याच घरी
आज धुंद धुंद राहे

कोणी पाखरं नाहीत
नाहीत इथं रावे
मैना दिसेनात कुठं
कुठं चिमण्यांचे थवे

कबुतरे कावळेही
घारी पारवे बगळे
सारे घरट्यात बंदी
घरं दारं टाळे कोंडी

वाट इथली ओसाड
खुणा पावलांच्या नाही
पशु पक्षी प्राणी सारे
गाव हिंडायला गेली

गाव रान झालं म्हणं
माणसाची चूक झाली
हुंदडणारा माणूस
हाव त्याची भूक झाली

कोणी आला रोग सांगे
माणसाला धोका केला
सारं माझ्यामुळं आहे
होता माणूस म्हणला

नाही श्वास मोकळा की
मोकळ्या त्या हालचाली
घरी बंदिवास त्याला
अशी कशी वेळ आली

राजा माणूसच होता
त्याची चलती चालायची
आता श्वासासाठी एका
जीव उधार मोलायची

गावं शहरं घरात
गल्लीबोळी चिडीचूप
माणसाचा फोटू सुद्धा
बांधल्या फडक्याच्या आत

गेलं रान शहरात
आणि गावागावामंदी
कसं वाटतंय गाव
फिरून धुंदीमंदी

रस्त्यावर पशुपक्षी
खिडकीतुन माणूस
आतातरी जपू सारे
एकमेकाचं टिपूस

चला पुन्हा रान फुलो
गावातून झुले झुलो
शहरात उद्योगांचे
चाक गोल गोल पळो

दि.२०/०५/२०२०
सायं ७.३४ वा.




## (२१)
## अंदमानी यमराजही थकला

निधडी छाती, भीतीस भीती
धडकी भरविते स्वदेशप्रीती
त्या प्रेमाची आण घेतली
अग्निपरीक्षा दिधल्या किती

एक उडी सागरात घेऊन
चळचळ कापविले त्याला
अथांग असुनी नतमस्तक तो
विनायकाच्या धैर्याला

कोलू दमला फिरून गोल तो
देशप्रेमाने गंधित घाम
श्वासावरती कोरून ठेवंत
हिंदुस्थानाने प्रिय नाम

कसा जपावा देश पिचलेला
परकीयांच्या जाचात
त्या मातेच्या वेदनेपुढे
अश्रू धळती नित हृदयात

हृदय पेटते उसळून उठते
काव्य होतसे कारागृही
लिहिती मिटवून आंग्ल हसतंसे
कसा मिटवू शकणार मती

या बुद्धीचा सूर्य तळपतो
साहित्याच्या गगनात
भाषा होते स्वयं शारदा
भाव प्रकटती अर्थात

संसार कोणता, देशाचा
सर्वस्व कुणाचे, देशाचे
प्राण कुणाचे देशाचे
हे रुधिर कुणाचे, देशाचे

क्षुधा कशाची स्वातंत्र्याची
तृष्णा कोणती देशप्रेमाची
आशा कोणती वीरमरणाची
भाषा कोणती स्वाभिमानाची

यज्ञ चालला भारती वेदी
मंत्र ऋचाही स्वतंत्रताची
आता आहुती टाका म्हणता
प्राण घेतले देण्या हाती

अंदमानी यमराजही थकला
दुर्दम्य मानवापुढे वाकला
घेण्या आला देऊन गेला
दीर्घायुषी वर विनायकाला

अघोर ऐसा कारावास
कसा सोसला विश्वासात
तुम्ही कोण मज शिक्षा देता
देशंच तुम्हा घालील लाथ

कठोर वज्राहून होतंसे
अंतरंग कोमल कुसुमे
तारुण्याची दिली आहुती
समर्पणाची त्यागफुले

किती तितीक्षा किती परीक्षा
डरला नाही सिंह कधी
फुटे गर्जना नभांगणातून
चळचळ कापे शत्रू उरी

असा त्याग ना होणे कधीही
चरित्र सुरभी दिव्य अशी
एकंच होती प्राणसखी ती
देश म्हणती तिज कुणी माती

त्या मातीचा टिळा कपाळी
उज्जवल दमकत आहे अजून
राष्ट्रप्रेम म्हणताच ओठी ये
सावरकर नाव त्यात भिजून

देशाच्या विरहाग्नीमध्ये
तळमळलेला पुत्र असा
माता झाली सार्थक त्याचे
उन्नत प्रेम जिंकले पहा

ज्ञान असो विज्ञान असो की
असू दे गंगा मतधारा
परखड मत हे नेई वाहून
त्यांच्या प्रेमे बहु वारा

त्या धगधगत्या हृदयामध्ये
केवळ भारतमाता होती
राष्ट्रपुरुष ना होणे ऐसा
अशी चेतवून गेला ज्योती

त्या प्रेमाची तुलना नाही
नको व्हावी कधी अवहेलना
राजकारणी काय जाणतील
रुक्मिणीच्या तुलसी पाना

नमन तुला रे वीर पुरुषा
गुणगान करावे मी कैसे
देशासाठी देता यावे
मजला यौवन तुज जैसे

दि.२८/०५/२०२०
दुपारी ४.२१ वा.



## (२२)
## पिनू

पिनू किती प्रेमळ होता
शरीराने फक्त बोका
भाव माणसाचे सारे
मनातून तो जाणता

शांत तो सहज वावरे
प्रेमळ स्वभाव गोडा
वर्षे पाच जन्म जणू
जगवून गेला वेडा

चार मास होता आला
अचानक घरी माझ्या
स्वाभिमानी वागणं त्याचं
सीमा बांधे स्वतः च्या

दूध प्रिय प्राणांहून
परी तोंड ना लावे तो
समोर दिसे ना चाटे
मीच त्याला देईपावेतो

स्वयंपाकी मी रमता
खुर्चीवर बसे राजा
जणू साथ देत तो
उरक पाहतसे माझा

दोन मुलींचा भाऊ होता
राखी त्याच्या हाती बांधली
कसली नाती कुठून जुळती
सांगा कशाने कशी सांधली

तीन मुले ही माझी लाडकी
आजही तो ना सोबत आहे
नाही गेला कुठेच पिंनुला
मनात माझ्या पिंगा घाले

कुठे कधी जर गेलो बाहेरी
गावाकडती दूर जरा
सोडून मजला गेला म्हणुनी
रुसुनी घाले तो कितीक चकरा

डोळे मोठे करून गुरगुरे
मला सोडुनी जाता सारे
राग अनावर अनुरागाने
प्रेमळ नखरे त्याचे सारे

राग तयाचा घालवण्या मग
धावत येई मधुर पेढा
राग पळत तो सुटे तयाचा
पडे पेढ्याचा लाडिक वेढा

उंदीर असू दे असो साप की
मारून आमुचे रक्षण तो करी
तो असताना नसे कशाची
भीती आम्हाला कधीच खरी

या जगतातून जाण्याआधी
दृष्टी त्याची निघून गेली
मीच नजर मग होत पिनूची
सारी सारी काळजी वाहिली

निज माझ्या नंदलाला
आळवीत गीता झोपतसे तो
कायमचा तो निजला तेंव्हा
धारा डोळी झिरपतसे हो

आजही तो आहे लाडका
आमुच्या घरचा पिनुमार्जार
पुन्हा पाठवा देवा त्याला
वाट पाहते घरदार

दि.२७/०५/२०२०
रात्री १०.०५ वा.




## (२३)
## व्रतवैकल्ये साधना

असो कर्तव्य कोणते
भारतीय नारी आम्ही
व्रतवैकल्ये साधना
संस्कारांची सांभाळणी

रक्षक समाजाच्या
आम्ही कर्तव्याला दक्ष
ते न चुकवू कधीच
परी सणावारी लक्ष

आधी कार्यालय बघू
वेशभूषाही राखावी
सण सावित्रीचा आला
सत्यवानाला वाचवी

साऱ्यांच्या रक्षणाची
आम्ही शपथ घेतली
वाचवू की प्राणनाथा
होत सावित्रीच्या लेकी

दिन नाही आम्हा नाही
रात कठोर ते कार्य
सण मनात राहती
वेळ मिळता कर्तव्य

आम्ही पोलीस पोलीस
वर दणकट खूप
आत हृदय मेणाचं
स्त्रिया ममतेचं रूप

साऱ्या भगिनी सजती
शालूपैठण्या नेसती
अलंकार अन शृंगार
वड पूजण्यास येती

मनी आमुच्याही श्रद्धा
वड दारातच उभा
गणवेशधारी आम्ही
सात सुतवू की धाग्या

मिळो साथ सात जन्म
धनी रहावा दणकट
देशकार्य करताना
कुंकू असो बळकट

नसो घराची की चिंता
त्यानं प्रेमानं पहावं
किती थकलो जरी ना
त्याच्या छत्रात राहावं

असो दीर्घायुष्य त्याला
आज मागते वडाला
मन सजलेल्या सती
धागा प्रेमाचा बांधला

सात फेऱ्या सप्तपदी
सात फेऱ्या सप्तजन्म
साथ साथीने चालणे
तो माझाच आजन्म

वडवड जीवनात
वड ज्येष्ठाच्या मासात
मन वड खातं येण्या
दारी वड पुजण्याला

हाती शस्त्र मनी शास्त्र
दोन्ही जपतो रे देवा
आजच्या स्त्रियांना वाटे
बघ आमुचा हा हेवा

दि.०५/०६/२०२०
रात्री ११.११ वा.




## (२४)
## रस्ताच एक आस

रस्ताच एक आस
होती जिवास मजला
का वादळाने ऐसी
उडवून द्यावी तिजला

खचला म्हणे कुणी हा
पांथच गावचा की
कोणी म्हणे सरकला
थोडा हा बाजूला की

रस्त्याची चूक आहे
की वादळाची सांगा
कोणी जिवास माझ्या
बेचैनीला न टांगा

माणूस खातो पैसे
रस्ता उजाड होतो
वारा उधाणलेला
त्या माणसा उघडतो

वरपांगी जीवनाचे
वरवरचे हे दिखावे
पाळेमुळे न घट्ट
कोणीही उखडावे

रस्ताच नेतो मजला
त्या झोपडीत माझ्या
याच्या कडेला होती
एक राहुटी तुरांट्या

नेलीस तीही वाहून
रस्ता घरात आला
पाहून माझे डोळे
तोही उगाच ओला

तो थांबला दुचाकी
वाला निराशतेने
पोटास भरण्या त्याला
गरजेचे शहरी जाणे

उजडून गेल्या बागा
केळी ह्या ओक्याबोक्या
पडल्या ना पोफळीही
निर्जीव उन्मळून त्या

काजू नि आंबे बागा
खच पायथ्याशी त्यांचा
कौलारू पत्रे गेले
जीव मुकला काहीजनांचा

घरदार हलवून गेले
मन हेलावूनही गेले
जगणेच इथले सारे
वारे पुसून गेले

कसले निसर्ग वारे
का दोष मानवाचा हा
रचतो विनाश मानव
आपल्याच हाती पहा

चल सावरू मना रे
रस्त्यास त्या घरास
बांधू पुन्हा नव्याने
निर्भेळ जीवनास

दि.१०/०६/२०२०
सकाळी ९.५७ वा.



## (२५)
## अश्विन वद्य चतुर्दशी

अश्विन वद्य चतुर्दशी,
नरकचतुर्दशी
अभ्यंगस्नान, उटण्यांच्या
अंगावर राशी

अपामार्ग वनस्पतीने
अंगावर प्रोक्षण
स्नानाआधी घरोघरी
मंगल औक्षण

प्राग्ज्योतिषपुरीचा राजा
नरकासुर माजे
भूदेवीकडून वैष्णवास्त्र
घेऊन गाजे

गांजे साऱ्या देवादिका
राजामहाराजा
इंद्राचा गजाश्व हरिला
सोळा सहस्र राजकन्या

बंदीवासी राजे त्यांच्या
स्त्रियाही डांबिल्या
स्वर्ग धरा अत्याचारे
त्याच्या वैतागल्या

इंद्र करी कृष्णाची
प्रार्थना मनोभावे
देवा मुक्त नरकासुर
यातनेतून करावे

युद्धा मध्ये मारियेला
असुर नरकी
सारे बंदी सोडियले
मुक्त साऱ्या या कन्यकी

मागताच वर दिला
नरकासुराला
आज करी मंगल स्नान
नरक ना त्याला

सूर्योदयापूर्वी करी
स्नान ते अभ्यंग
नरक यातना नाही
कृष्ण वर तो अभंग

अश्विन अमावस्या किती
शुभदा वरदा
लक्षुमीच्या पूजनाने
धन नि संपदा

सुशोभित मंडपात
लक्ष्मी विष्णू कुबेराला
आज सुदिन हा
मनोभावे पूजण्याला

बळी कारागृहातून
लक्ष्मी केली मुक्त
तिच्यासवे देव सारे
विष्णुमुळे भक्त

सारे देव झाले
क्षीरसागरी निद्रिस्त
आज यांच्यासाठी
दिवे उजळा समस्त

चौरंगी अक्षतांचे
कमल अष्टदला
त्यावर लक्षुमीची
स्थापना कमला

साळी लाह्या बत्ताशे
बासुंदी नैवेद्याला
वाटावा प्रसाद सारा
आप्तेष्ट जनाला

लक्ष्मी संचारते आज
रात्रभर इथे
योग्य स्थान निवासाला
स्वयेची शोधते

शोभा स्वच्छता नि
रसिकता जिथे असे
स्त्रियांना मान सन्मानही
ज्या ज्या घरी दिसे

धर्मकर्मदेवनिष्ठा
क्षमा संयमही
गुणवती स्त्रियांचा
हास्य विनोदही

असे गृहलक्ष्मी
आनंदात जिथे
लक्षुमीही राहण्यास
नित्य येई तिथे

अशा दिवाळीत
आनंदाला नाही तोटा
जीवनाचा उत्सव हा
उत्साहाने भेटा

दीप सारे उजळुनी
प्रकाश पसरो
नवे तेज नव्या आशा
मनात पसरो

दि.१४/११/२०२०
सकाळी ११.११ वा.



## (२६)
## श्रीमंती कशाची

असे श्रीमंती कशाची
अंगणातल्या गोठ्याची
हंबरते धेनु माये
वत्स लडिवाळ चाळे

वाहे गोरसाची गंगा
बाळगोपाळांचा दंगा
लोणी चाटतो श्रीहरी
गाय धन्य गे भूवरी

स्वर्गी कामधेनू आहे
सुरभीही तीच पाहे
देवदुर्लभ हे तक्र
लोणी घृत दीर्घायुषे

प्रिय विष्णुस जशी ही
दत्तगुरूंचे निधान
साऱ्या देवांची वसती
आहे तिच्यातंच धाम

देह मानवी पोसते
तनमन स्वस्थ राहे
देई धनाचे ऐश्वर्य
दुग्ध अमृताने वाहे

तिची नजर कनवाळू
वासरास चाटणारी
चला पुजू या वारसा
वसु बारस हो दारी

दीप लावूनीया दारी
नैवेद्यास तिज चारी
देई आशीष मधाळ
गाय समृद्धी प्रसारी

करू आरंभ दिवाळी
संस्कृतीची मांदियाळी
पर्व प्रकाश पसरे
उत्सवाची दिपवाळी

दि.१२/११/२०२०
सकाळी ०९.४५ वा.



## (२७)
## अश्विन वद्य त्रयोदशी

अश्विन वद्य त्रयोदशी धनत्रयोदशी
धन्वंतरी वैद्यराज जन्म या दिवशी

अतिशुभ दिवस हा धन पुजण्याचा
सोने, नाणे, अलंकारा उजळंण्याचा

विष्णू,लक्ष्मी,कुबेर,गणेश,योगिनी ह्या
नाग आणि द्रव्यनिधी करा पूजनाला

अखंड दीप लावा, पायसाचा नैवैद्यही
सोबतीला यथाशक्ती परोपकरही

अपमृत्यु टाळण्याला करी दीपदान
यमराज नेत नाही अकाली हे प्राण

घरातली स्त्रीच आहे लक्ष्मीस्वरूप
आज त्यांच्या अभ्यंगाने पर्वा सुरुवात

द्यावे अलंकार वस्त्र नूतन तयांना
सन्मान आधी मिळो सकल स्त्रियांना

हो प्रसन्न रमादेवी धनत्रयोदशी
धन बरसात करी लक्ष्मी सदाची

आज घ्यावे सोने भर ऐश्वर्यात होई
संपत्ती नि आरोग्याची लयलूट पाही

देववैद्य धन्वंतरी पुजावेत आज
आरोग्याची संपत्ती देतील वैद्यराज

शुभेच्छा नि फराळाची लगबग व्हावी
आली दिपवाळी तेज घेऊनी ती आली

दि.१३/११/2020
सकाळी ०७.५५ वा.




## (२८)
## संक्रांती ही शुभा होऊ दे

तू तिळराजा मी गोडी गुळाची
एकरूप हो जोडी गुणाची
तुझ्या नि माझ्या मीलनास या
नजर ना लागो कधी कुणाची

प्रेम माधुरी तिळात शिरली
गोडी गुळाची तिळभर भरली
स्नेह तिळाचा जन्मभरीचा
दोघे मिसळून परस्परांशी

तिळतिळ दोघांनी तुटणे मग
असे आगळे हे भेटणे मग
सारे विसरून स्वत्व खुणांना
नवसृष्टीला प्रकटवणे मग

मी गूळ गोडवी तिळभर पुरुनी
जगण्यामध्ये जावी पसरून
स्नेह मनातील तुझ्या तनातील
पाहून दुःखे जावी विसरून

एकरूप एकतान एकजीव
कणकणातून होऊन जाऊ
अशा मीलनी अस्तित्वाच्या
भिन्न खुणाही सोडून देऊ

कधी वाटते तुला जरी मग
गोल गोडुला होऊ लाडु
कधी संसारी व्यापून तनमन
चिक्कीच्या या वड्याही पाडू

कधी कष्टाचे सोसून चटके
घट्ट नाते पाक तिळवा होऊ
कधी आपत्तीमध्ये कुटुनी
देहाला या सारण बनवू

वर पाती सुखाची खाली दुःखाची
मध्ये आपण खुशाल पसरू
तिळगुळ पोळी गोडगोडुली
धार तुपाची अलगद फिरवू

ऋतू येऊ दे घेऊन गोडी
पुन्हा पुन्हा नित असा जीवनी
माझे मीपण तुझेही तुपण
तिलांजली या सहजी अर्पूनी

असा चालू दे दीर्घ सोहळा
वरचेवर प्रीत बहरून जाऊ दे
उत्तरायणी देवप्रभाती
संक्रांती ही शुभा होऊ दे

सूर्य तळपू दे दिशा उजळू दे
अनुरागाचा दिवस वाढू दे
थांब सख्या या मधुर वळणी मज
प्रेमालापी चित्र काढू दे

दारी टाकू दे सडा रांगोळी
अत्तर शिंपून घर परिमळू दे
तुझ्या नि माझ्या प्रेमाची ही
रथी सप्तमी जगा कळू दे

असा गोडवा वाढत जाईल
चरम प्रीतीला तिळगुळ होईल
स्वर्गामधल्या सुधामृताचे
कणकण तिळगुळ घेऊन येईल

असे संक्रमण रोज सुखावे
सारे विसरून खरे जगावे
नवीन पान जगण्याचे आपण
प्रीतकरांनी उलटून द्यावे

दि.१४/०१/२०२१
सकाळी ०७.५१ वा




## (२९)
## अविरत चाले साधना

स्वर निनादे कंठातून या
अविरत चाले साधना
जीवनपुष्प सप्तसुरांसवे
करुणामय आराधना

गुरुऋणाची मनास जाणीव
शिष्या उत्तम आजही ठरते
किती जणांची घडवून रत्ने
गुरुपदी लीलया विराजते

मनात करुणा ओसंडते अन
स्वरचांदणे गाता पडते
चिंब रसिक ते होती त्यातंच
स्वरवर्षा ही ऐशी घडते

मन निरागस बालकासम
निष्पाप अशा या सरल भावना
मैत्र मनीचे जपते आतून
नात्यांना ही हवीहवी ना

छात्रप्रिय गुरू, लाडकी सखी
मातापित्यांच्या आज्ञेमधली
केली सेवा जन्मदात्यांची
ओळख झाली संगीतातली

उदंड लाभो आयुष तुम्हा
सूर होऊ दे सदैव आशा
पूर्ण होऊ दे स्वप्नं मनीचे
करते कामना ही मंजूषा

दि.०५/०१/२०२१
सायं ०७.५१ वा.

## (३०)
## जीवेत् शरदः शतम्

जीवेत् शरदः शतम् कल्प
जीवेत् शरदः शतम्
सद्गुणी भव सुखसंपन्नः
कुलवृद्धिः यशकार्यम्

ईश्वर की मिल जाये कृपा
और ज्ञान संपदा तुम्हे मिले
हसी रहे होठोपे तुम्हारी
आंगण फूल खिले

आज तुम्हारा तृतीय जन्मदिन
ज्येष्ठ पधारे सारे सत्वर
उपाध्याय परिवार चाहता
रहे सुखी और कल्प उदार

माया पन्ना लीना तीनो बा
वैद्य रवींद्रजी यश देव जा
खुशबू आई आई भारती
अंश प्यारका नोएल नॉबी

धवल कितना कृतार्थ आज हैं
शीतल उसकी साथसंगिनी
परेशदादा और प्रज्ञा बा भी
दे रही आशीष खुशीखुशी ही

अनुपा बुवा राकेशजी आये
करण भाई सब आप्त समाये
नानानानी मामा दौडे
लाये लाये खुशीया लाये

जियो जियो मेरे लाल जुगजुग
परिवार की खुशी बन जाओ
बढे कदम तुम्हरे प्रगतीपर
मंजू बुवा कहे सब सुख पाओ

दि.३०/०१/२१
सायं ०७.०० वा.

## (३१)
## माझी मायबोली

मायबोली सुबोली
भाव सांगते
मनाची खोली
माझी मायबोली

किती शिकाव्या भाषा
पर मनाची आशा
कळकळ सांगतीया
माझी मायबोली

जवा आतलं काही
सांगावं बाई
भ्या वाटलं का दुःखाची सई
माझी मायबोली

एकलं ऱ्हाता
संगतीला ती
मनाची बोली मना कळली
माझी मायबोली

जगाच्या पाठी
साथसंगती
गुज मनीचं असं सांगती
माझी मायबोली

तिच्या शब्दा शब्दात
अमृत वाहं
आपुलकीचा झरा पाझरं
माझी मायबोली

शब्द रूप देवाचं
ओळख पहिली
माय बोलते ते बोल बोलली
माझी मायबोली

तिची माया ही हाय
तिची काया ही हाय
आठवण तिची जगात ऱ्हाय
माझी मायबोली

जगाया पाहिजे
माय मायबोली
वाचतीया ऱ्हाता अबोली
माझी मायबोली

काळजाचा कप्पा
खोलतीया ही
आतल्या गप्पा मारतीया ही
माझी मायबोली

साधंसुधं तिचं रूप
रुपात गं एक गोडी
जन्मभरीची ही जोडी
माझी मायबोली

तिला जगईण्यासाठी
बोल ऱ्हाऊ दे ना व्हटी
लाज कसली रं तिची
तीच माझी मायबोली

सहजंच बोलतीया
कवटाळून घेतीया
माय रोज ती व्हतीया
बघ माझी मायबोली

अंतरात अभिमान
ठेव तिला तू जपून
दे की वारसा पुढती
अशी माझी मायबोली

दि.२१/०२/२१
सकाळी ०८.४३ वा.
आंतरराष्ट्रीय मायबोली दिन

## (३२)
## असे वेगळा प्रवास

मधुकर ते माधवराजाचा
असे वेगळा प्रवास
जगण्यामधुनी दरवळताहे
कर्मप्रवणता सुवास

आसक्ती अन अशी विरक्ती
संसाराचे गम्य जाणले
एका जन्मामध्ये जयांनी
परमेशाशी रम्य आणले

कणखर खंबीर तना मनाने
जीवन भरले अध्यात्माने
शास्त्र वैद्यक तज्ञ एकीकडे
एकीकडे जीवन त्यागाने

सुयोग्य मार्ग दाविला आम्हाला
संततीसाठी प्रेम उजागर
कन्येवरती अधिक जरासे
तिच्या जीवनी सुखमय आगर

जरी नियमांचे पालनकर्ते
मनी जिव्हाळा काळजी भरपूर
आणि ईश्वरी कृपा लाभली
सार्थक त्यांचा जन्म पुरेपूर

आज जन्मदिन एक पित्याचा
पती, वैद्य वा निज भक्ताचा
रंग गडद हा सांगून गेला
रक्तापेक्षा ईशभक्तीचा

असे हे जगणे आदर्शाचे
अभिमानाची मनी भावना
त्या चरणांची सेवा करता
श्रेष्ठ पद मिळो हीच कामना
जन्मदिनाच्या शुभ भावना
जन्मदिनाच्या शुभ भावना

दि.१४/०२/२१
दुपारी ०१.१९ वा.

## (३३)
## हास्य विलसते मुखी

हास्य विलसते मुखी सदैव
प्रसन्नतेचा झरा
भारती प्रेरक उत्साहाचा
स्रोत वाटते खरा

घरीदारी साऱ्यासाऱ्यांना
हवीहवीशी बोली
ही लाडाची झाली सहजी
नव्या नावाची डॉली

मुखी मधुरता वर्तनी तैसी
ज्येष्ठांची काळजी
मदती धाऊन जाते कोणा
स्वभाव ऐसा की जी

सासर माहेर प्रेम देते तिज
सासू प्रेमळ भारी
सौख्य उभे बघ हात जोडुनी
भारतीच्या संसारी

वेलीवरती दोन फुले
होऊन मुले उमलली
कामामध्ये गुंतवून ती
वाट यशाची चालली

नॉबी नील नॉयल हे सारे
जगणे होऊन गेले
हसऱ्या खेळत्या वातावरणी
मोद भरून हे गेले

चेष्टा मस्करी करतो नॉबी
हसविण्या भारतीला
आणि आनंदी राहती सारे
जगून घेती जगण्याला

सुगंधी अत्तर ऐसे जीवन
लोभस वाटे तिला
दीर्घ आयुष्य मिळो निरामय
मंजु शुभेच्छा तुला
भारती, खूप शुभेच्छा तुला
डॉली, उदंड शुभेच्छा तुला

दि.२५/०२/२१
सकाळी ११.५१ वा.

## (३४)
## ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी

भाषा न केवळ, असे मायबोली
शतकानुशतके जिने कोरलेली
ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी
तिचे बोल राहोत या नित्य ओठी

शिलालेखातूनी अशी डोकावे जी
नव्या शब्दा लेऊन सजते अशी ती
किती ग्रंथ झाले न होतील ऐसे
जरा या विसावू हिच्या रम्य काठी
ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी
तिचे बोल राहोत या नित्य ओठी ।।१।।

मुकुंदाचा सिंधू लीळा चरित्र
भवार्थदीपिका ओव्या अभंग
किती आरत्या भारुडे गारुडे ही
टिळा कौतुके लाऊ सारेच माथी
ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी
तिचे बोल राहोत या नित्य ओठी
।।२।।

कथा नांदती, नांदती शब्दपंथी
निबंधे, चरित्रे, दीर्घ कादंबऱ्या ही
इतिहास सांगे, नि नाट्यात गुंगे
साहित्यसरिता ही अवघीच मोठी
ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी
तिचे बोल राहोत या नित्य ओठी।।३।।

भावकाव्यात भिजली, गीतांत रुजली
लोकसाहित्य अंकुर रूपे उगवली
कोशात नटली परी नाही गुरफटली
आतून होती अशा रम्य भेटी
ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी
तिचे बोल राहोत या नित्य ओठी।।४।।

असे ज्ञान मोठे विज्ञान आहे
अध्यात्म येथे चैतन्य वाहे
संस्कार पाथेय झोळीत देता
किती रत्न मोती तिच्या असती गाठी
ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी
तिचे बोल राहोत या नित्य ओठी।।५।।

कवी लेखकांची अशी मांदियाळी
झरा पाझरे अमृतांच्याच ओळी
असे नवरसांचे कुंकुम कपाळी
मुखावर विलसते विलक्षणसी कांती
ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी
तिचे बोल राहोत या नित्य ओठी।।६।।

बोलावी वाचावी लिहावी माय
जगावी जगवावी खुलवावी माय
किती बोलता अन्य भाषा तरीही
मायेचा ओढा माय मराठीसाठी
ऐश्वर्यसंपन्न ऐशी मराठी
तिचे बोल राहोत या नित्य ओठी।।७।।

दि.२७/०२/२१
सकाळी ०८.२१ वा.

## (३५)
## राहे हर्षद कुशल

गाव त्र्यंबक त्र्यंबक
शिव त्रिनेत्री आराध्य
आम्ही आराधी तयाचे
सदाशिव एक साध्य

तात  सदाशिव पिता
भक्ती माय ही अनिता
अशा घराण्यात जन्म
पुण्य अमीप फळता

विप्र संस्कार घडले
तेज जीवनी सांडले
श्वास चरणी मांडिले
क्षेत्र त्र्यंबक जोडले

कार्यक्षेत्र उंच गाठू
परी घर हे पाठीशी
मातपित्याचा आशीष
शिव वरद गाठीशी

झालो हर्षद घराचा
साथी लाभली अनुश्री
आम्हा प्रीतीचे गोडुले
कन्यारत्न ही भाग्यश्री

घर आनंदे मोहरे
पुत्री अन्विता विहरे
तिने पाठीशी दिलेला
वेदशाश्वत आहे रे

पुत्ररत्न हे लाभता
पूर्ण झालो मी संसारी
माया कन्येची आगळी
घरादाराला ती तारी

नातवंडांसवे रमे
जीव आजीआजोबांचा
आत्या मुदित पाहून
हर्ष तिच्या माहेराचा

कार्य करण्यास बळ
माझ्या पाठीशी सकळ
देव एक त्र्यंबकेश्वर
माता पिताही ईश्वर

काय हवे हो अजून
राहो असेच मंगल
खुश परिवार होता
राहे हर्षद कुशल
राहे हर्षद कुशल

दि.११/०४/२१
सकाळी ११.०० वा.



## (३६)
## विवाह असतो दोन जिवांचा

विवाह असतो दोन जिवांचे
धरातलेवर सुंदर मीलन
गाठी जुळतील प्रेमभराने
सांभाळावे देऊन तनमन

दोन वेगळ्या व्यक्ती होतील
एकजीव एक आत्मरूप जर
जपणे जगणे लोभसवाणे
सूर जुळुनी मंजुळ गाणे

कार्यामध्ये झोकून देऊन
गुंतवून निज वेळ सदोदित
धन्वंतरीची कृपा लाभली
सेवा आरोग्याची मुदित

तत्पर तुम्हा साथ देण्याला
अर्धांगिनी ही रत्न लाभली
रवींद्र आणि पन्ना जेव्हा
संसारात समरस जाहली

वरवर दिसती कडक स्वभावे
आत काळजी प्रेमही वाहे
पतिस्वभावाला या ओळखून
पन्ना सारी व्यवस्था पाहे

अन्नपूर्णेचा वरदहस्त तिज
प्रेमळ आपुलकीचा गंध
तिच्या मताला समजून घेऊन
सन्मानाने करता प्रबंध

ती गृहलक्ष्मी बांधून ठेवील
तुम्हीही बांधून घेता सहजंच
साथ तिला ती पूर्ण देऊनी
तिच्या मतांचा आदर अलगद

कणा घराचा असते स्त्री तर
पत्नी भार्या सखी सचिवा
पाळत गेले तुम्ही याला
तत्त्व जाणुनी मंत्र सुखाचा

परस्परांच्या भावमनाचा
आदर राखून प्रेम वाढते
संसाराच्या वेलीवरती
दोन फुलं नातू फळ लाडते

यश आणि देव पुत्र लाभले
काय हवे बस सारे मिळाले
सूनं आली दुसरीही येईल
अधुरेपण पूर्णत्वा नेईल

आदर आतिथ्याला तत्पर
आनंदाने जमती सारे
नाती सांभाळून दोन घरांची
तुमचे नाते फुलते असे हे

जुळून आली अनाम नाती
ऋणानुबंधची घडवीत जाती
कन्या नव्हती म्हणून मीही
मंजु फुलोरा घेऊन हाती

आपणास या शुभदिनी देते
उदंड मनीच्या अशा शुभेच्छा
संसारातील कृतार्थतेस्तव
पूर्ण होऊ दे सर्वच इच्छा

विवाह वर्धापन दिनाला
त्रेचाळिशी ही पूर्ण जाहली
सुवर्णमहोत्सव व्हावा लवकर
स्वप्नपूर्ती जी तुम्ही पाहिली

दि.०३/०३/२१
सकाळी ०८.२१



## (३७)
## पुस्तकांची कांती ही

पुस्तकांनी वेधले मज
वेड दिधले गोड हे
काळ बांधून ठेवला नि
साधले किती बांध हे

ज्ञान झाले शब्द व्याले
अर्थ आभूषण तया
खोल दडले नाते जडले
करिती पोषण सर्वथा

बालपण रमले तयातुन
वय किशोरही दंगले
रंगले तारुण्य यातून
वृद्धपणही भंगले

भाव सारे उमटले अन
तत्त्व सारे पटले हे
पुस्तकांची साथ मिळता
दुःख सारे मिटले हे

केली परिभाषा सुखाची
रम्यता एकांती ही
एकटी ना कधीच मी तर
पुस्तकांची कांती ही

निजता उठता अन प्रवासी
सोबतीला पुस्तके
ग्रंथ काही मोठमोठे
नमवू पुढती मस्तके

विश्वाचा आलेख यांनी
रेखिलेला आशये
नवरसांची मांदियाळी
भाव सारे बोलके

काही ना दे मज सख्या तू
पुस्तकांची ओढ दे
मी गढून जाता तयातच
पुस्तकांनी ओढ रे

दि.२३/०४/२१
दुपारी ०२.०९ वा.



## (३८)
## दुःख बोलके वसुंधरेचे

वसुंधरा दिन आहे म्हणुनी
बोलते काही आज
दुःख मनातील सांगू कुणाला
आहे मी नाराज

घ्या मुलांनो काळजी माझी
तिळतीळ तुटते आहे
वर्तन हिंसक मर्म छेदिता
काळीज फाटते आहे

तुम्हा पोसते अन्नजलाने
प्राणवायुही देते मी
वस्त्र निवारा शीतल छाया
ऋतू सुंदरसे आणते मी

वृक्षवल्ली मजवरची सृष्टी
केली अरण्ये नष्ट
कुरघोडी रे करता तुम्ही
खोदून करता भ्रष्ट

खणले सारे, भोके हजारो
जखमा भळभळणाऱ्या
उष्मा वाढवून हिमनग गळती
लाटा फेसाळणाऱ्या

अण्वस्त्रांनी विवस्त्र केले
बॉम्बगोळे मज भेदून गेले
विज्ञानाच्या प्रगतीमध्ये
बुद्धिभ्रष्ट तुम्ही वाहून गेले

अध्यात्माने माय मानले
कब्जा सांगे विज्ञान
ज्ञान कोणते नसते वाईट
हाव विखारी जाण

तुम्ही बागडा मुक्तपणे पण
मला हानी ना करा कधीही
आई बोलते हाक ऐका ना
मी जगले तर जगाल तुम्ही

नाते सुंदर युगायुगांचे
आईला असे छळू नका
पुन्हा कुशीतून फुलून येण्या
माया माझी कळून घ्या

दि.२३/०४/२१
सायं ०६.४६ वा.



## (३९)
## अक्षय्योऽस्तु शुभं सर्वम्

वैशाख शुद्ध तृतीया दिन
असे अति शुभ
देवांसाठी पितरांसाठी
दान यजन अक्षय्य

अन्नपूर्णा नरणारायण
याची दिनी अवतरले
परशुराम बसवेश्वर हयग्रीव
अक्षय्य दिनी जन्मले

साडेतीन शुभ मुहूर्त असती
अक्षय्यतृतीया एक
महाभारताचा व्यासांनी
आरंभ केलासे देख

स्वयं श्री गणराजांनी केले
लेखन ते अक्षय्य
नवं वस्त्रशस्त्र गृह वाहन वस्तू
अलंकरण अक्षय्य

युधिष्ठिरा वदले श्रीकृष्ण
करशील दान यजन
शुभ अक्षय्यदिनी अक्षय्य होईल
शुभ हेतू कण कण

अक्षय्य असू दे सर्व संपदा
अक्षय्य गुणगौरव
अक्षय्य विलसो यश कीर्ती मज
अक्षय्य कर्म सुरभ

अक्षय्य लाभो आशीष देवा
अक्षय्य हो सद्कर्म
अक्षय्य माझा जन्म भूतली
अक्षय्य मानवधर्म

अक्षय्योऽस्तु शुभं सर्वम्
वदला परमेश्वर
अक्षय्यतृतीया म्हणून अक्षय्या
तिथी सुंदरी खरोखर
तिथी सुंदरी खरोखर

दि.०३/०५/२०२२
सकाळी ०६.२१ वा.

(४०)
## महाराष्ट्रा ऽऽऽऽऽदेशा



हे राष्ट्रा सुराष्ट्रा देशा
महाराष्ट्रा ऽऽऽऽऽदेशा
तू भारतभूची आशा
नवपल्लव नूतन उषा ।।धृ।।

तू धडाडून लढणारा
तू क्रांती चेतवणारा
तू लखलख मुकुटमणी
तू शूरवीर तू मानी
तू अभिमानाची गाथा

हे राष्ट्रा सुराष्ट्रा देशा
महाराष्ट्रा ऽऽऽऽऽदेशा ।।१।।

तू अर्थसमाजकारणी मुत्सद्दी,
राजकारणी धुरंदर
तू संतमहंत तू विचार अनंत
तू खडक नद्या वनराई सुंदर
तू देशाची मनीषा

हे राष्ट्रा सुराष्ट्रा देशा
महाराष्ट्रा ऽऽऽऽऽदेशा ।।२।।

किती आव्हाने झेलून घेशी
निधड्या छातीपाशी
रक्त सांडले आपपर लढले
खचला तू न जराशी
तूच प्राची प्रत्युषा

हे राष्ट्रा सुराष्ट्रा देशा
महाराष्ट्रा ऽऽऽऽऽदेशा ।।३।।

जन्म मिळाला तुझ्याच पोटी
किती खर्चिले ते पुण्यकोटी
देह झिझावा उत्कर्षास्तव
कर्मसंचिका साठो मोठी
तू नररत्नांची मंजूषा

हे राष्ट्रा सुराष्ट्रा देशा
महाराष्ट्रा ऽऽऽऽऽदेशा ।।४।।

दि.०४/०५/२१
सकाळी ०९.५४ वा.




## (४१)
## तू तेज 'अंश' प्रचंड

तारा चिमुकला घरी अवतरला
सुख बरसात ही झाली
स्वप्ने सारी सान होऊनी
पिंगा घालून गेली

अवखळ लाडिक जरी बोलणे
तर्के विचारे प्रश्न
तल्लख बुद्धी अमाप धैर्य
विचार त्याचे स्पष्ट

जिम्नॅस्टिक खेळाडू छोटा
आनंदाची पेटी
हास्य निखळ ते चेहऱ्यावरती
टिपून घ्यावे ओठी

बडबडगीते पाठांतर किती
अभ्यासाची गती
नाव वाढवेल असा अंश हा
वंशाची प्रगती

आजीआजोबा रवींद्र पन्ना
यशखूशबू आईबाबा
देव काका सारे करती लाडा
उपाध्यायांचा अजूबा

जीवेत् शरदः शतम् रे बाळा
तू तेज अंश प्रचंड
आशीर्वाद हे तुला देतसे
मंजु आत्या उदंड

दि.२७/०५/२१
सकाळी ०९.३१ वा.



## (४२)
## त्यागी असतो वंद्य निरंतर

माणूस ज्याने उदात्त ठरतो
त्याग गुण हा कठीण पण तो
ज्याला जमला संयम आपुला
संतुष्टीने त्यागी निपजतो

कर्माचे कर्तेपण त्यागून
अहंभावाला द्यावे टाकून
भौतिक सुख वा असो मानसिक
त्याग पहावा समर्पणातून

त्याग, समर्पण बोलणे सोपे
करणे इतुके अवघड बाबा
त्यागाचा नुसता विचारंही
पेलवणे हो मुश्किल तोबा

अशक्य जगणे ज्याच्या शिवाय हे
व्यक्ती, भावना, सुख, कामना
अगदी सहजी सोडता यावे
असे त्यागी मग जगती किती ना

राग अहंकार अगणित भावा
त्यागाने त्या न्यावे विलया
आधी इतरांचा विचार व्हावा
नमन करी जग त्यागी मानवा

सुखत्यागी निज परिवारास्तव
मोल तयाचे होईल, ना हो
त्याग जगत्कल्याणा घडता
आदर श्रेष्ठ बहाल होई हो

त्यागी असतो वंद्य निरंतर
सत्य अहिंसा संयम तो तर
देशासाठी जन्म उगाळून
दावी वि.दा. तात्या सावरकर

त्यागमूर्ती त्या वीरवराला
करूया शतशः नमन चला हो
पुन्हा जन्म मज लाभो तैसा
मातृभूमीस्तव तळमळला जो

दि.२८/०५/२१
सकाळी ९.११ वा.



## (४३)
## उडू दे ग्रंथातून पाखरे

उडू दे ग्रंथातून पाखरे
कधी न मिटतील अशी अक्षरे
ज्ञानाच्या आभाळी भरारी
पंख तयांचे बलवत्तरे

असे वाचता नव नव लेखन
घडवीत जाते मानव वाचन
त्याने घडते उज्ज्वल जीवन
संस्कारांचे सुवर्णमय कण

बुद्धीवैभव वाढत जाते
ऐश्वर्याच्या भरात नेते
मती शुद्ध ती करीत जाते
गौरव वृद्धिंगतता येते

मानसिक बळ एकवटते
मनास काही नव्याने पटते
ग्रंथांमध्ये रमावे वाटते
इथेच सारे विश्व भेटते

इथून मिळवून पंख नव्याने
घेत भरारी उंच मनाने
आकाशाला व्यापत जावे
नभातुनी मग नभ पसरावे

विहंगमाच्या अवलोकाने
उंच उडावे जगास पहावे
सुंदरतेच्या सृष्टीवरती
पुन्हा नव्याने भाळून जावे

अशी पुस्तके हृदयी धरावी
मित्र मानुनी बिलगून जावी
ते साथीला साद घालतील
सारी स्वप्ने त्यांतच पहावी

कुणी हे रचले, कशास रचले
कधी कुणाला कसे ते सुचले
ते आहे एक कोडे गोडंच
शारदाकृपे ब्रह्म वेचले

तिच्या कृपेच्या चांदण्यात या
नाहून घ्यावे चकोर होऊनी
पुत्र तिचा मग होत लाडाचा
गौरव घ्यावा ओंजळ भरुनी

चला उडू या पुस्तकातुनी
कल्पनांच्या या घेत भरारी
कवी होऊ व लेखक होऊ
अथवा वाचक घेत तरारी

अशी पुस्तके वाचत जाऊ
गीत नव्याने आळवीत राहू
अलगद उतरत लेखणीतूनी
होत शब्द अमरत्त्वा पाहू

दि.२३/०५/२०२०
दुपारी १२.४७वा.




## (४४)
## अक्षय्य आशीष देवा तुझा

अक्षय्य असू दे सुख हे आपुले
अक्षय्य समृद्धी सारी
अक्षय्य वसू दे लाभही सगळे
अक्षय्य शुभता ये दारी

अक्षय्य आरोग्याची खनी ही
अक्षय्य विश्वातील शांती
अक्षय्य असू दे गुणवैभव नित
अक्षय्य विलसू दे कांती

अक्षय्य सूर्य चंद्र तारका
अक्षय्य ग्रहगोल पृथ्वी ही
अक्षय्य गंगादी या सरिता
अक्षय्य राहो हिमालयही

अक्षय्य भारतदेश राहू दे
अक्षय्य इथली स्वतंत्रता
अक्षय्य मानवता ही भावना
अक्षय्य वैश्विक बांधवता

अक्षय्य राहो कर्मभावना
अक्षय्य गीतामृत धारा
अक्षय्य माझी श्रेष्ठ संस्कृती
अक्षय्य ज्ञानामृत झरा

अक्षय्य साहित्याची शारदा
अक्षय्य शुभलक्ष्मी ही सर्वदा
अक्षय्य कुबेर खजिना सारा
अक्षय्य अध्यात्माची संपदा

अक्षय्य माझी श्रद्धा भक्ती
अक्षय्य राहो विनम्रता
अक्षय्य असू दे तृतीया तिथी ही
अक्षय्य आशीष देवा तुझा

दि.१४/०५/२१
सकाळी ०६.११ वा.



## (४५)
## अनंत अवकाशातून आली

अनंत अवकाशातून आली
डवरून सोनफुलें साजिरी
नका घाबरू तुम्ही कुणीही
निसर्ग जपता जपेल तोही

झाडावरती बहरू आली
सोनपिवळी ही भविष्य नांदी
उज्जवल असता दिस सोन्याचा
कशास कुढता मनात बंदी

आम्ही सांगतो रमवा चित्ता
अंतर्मनीही भेटा ईशा
आदेश तयाचा फुललो आम्ही
फुलाल जपता तुम्ही सृष्टीला

हे सोनेरी वचन आमुचे
मनात फुलवील जीवन आशा
गळणे सुकणे माहीत तरीही
झाडावरती डोलणे भाषा

नका काळजी, चिंता व्यर्थ
जीवन आहे सुरेख अर्थ
वसुंधरेला नकोच छळणे
मातेला त्या करण्या सार्थ

चला जपू या तिला जराशी
प्रेमाची ती खाणची ऐशी
म्हणून पताका झालो आम्ही
कोविड ची ही ऐशी तैशी

दि. ०८/०५/२०२०
रात्री ८.३१ वा.



## (४६)
## हा चंद्र अमृताचा

पहाटे भल्या उगवला
हा चंद्र अमृताचा
कोजागिरीच्या साठी
निधी होत औषधींचा

जेथून जन्म त्याचा
त्या सागरास भेटे
एकांत शांतवेळी
सांगे मनातले ते

जी लक्ष्मीही निघाली
तव मंथनी कृपेने
मी आज तिजसवे हा
धरणीस सौख्य देणे

करती प्रतीक्षा सारे
हे वैद्यराज माझी
येताच पौर्णिमा ही
सिद्धीस औषधी की

रात्रीस मेळे भरती
गप्पा नि गोष्टी रंगी
तेंव्हा कुठे उसंत
भेटेल मजसी संगी

म्हटले उठून यावे
हे सागरा पहाटे
तू जन्मदाता आमुचा
भरती तुलाही येते

अश्विन हा मास ऐसा
ऋतू शारदीय शीतल
खुश मी अशात खूपच
सागर, गगन नि भूतल

देईन आज सारे
माझे म्हणून जे जे
शीतल चांदणे अन
अमृत पाझरावे

कोणी युगुल प्रेमी
माझ्याच आज साक्षी
जीवास गुंतताना
डोळ्यात चांदपक्षी

साऱ्या वनस्पतीही
होतील पुष्ट आज
संवत्सराने एका
हे दान मिळते त्यांस

मी भेटतो तुला रे
रश्मींच्या या करांनी
भरते उरात तुझिया
हे बिंब साठवांनी

येते उधाण तुजला
पहाटेस अमृताचे
कोजागिरी करू या
नाते युगायुगांचे

दि.३०/१०/२०२०
सकाळी ९.५३ वा.



## (४७)
## वर दे शारदे

रूप शुभंकर वाग्देवी तव
विद्या ज्ञान प्रदायिनी
कला नृत्य संगीत शारदे
वसंत पंचमी तिथी जननी

माघ शुद्ध पंचमीस प्रकटे
ही शब्दांची ईश्वरी
त्रिभुवन मुखरित गीत गायन
कलामयी भुवनेश्वरी

उत्पत्ती हिची जगकल्याणी
नाद उमटले हिच्यासवे
शब्दहीन अधुऱ्या विश्वाला
शब्द लाभले हिच्यासवे

शब्दराज सेवक देवीचे
रस ज्ञान विद्या वाणी
संगीताची स्रोत ठरतसे
साहित्याची गुणगाणी

कला जन्मल्या हिच्या कलांनी
वीणेचा झंकार झणी
वेदग्रंथही हिच्याविना ना
प्रकटु शकते काही मनी

हीच प्रतिभा कविराजांची
विद्वानांची विद्वत्ता
बुद्धीवरती सदैव चाले
गणेशासवे हिची सत्ता

सत्त्वगुणाचे रूप घेऊनी
भक्ती बुद्धी ज्ञान वसे
स्फटीक माळ ही सांगत जाते
ज्ञानासाठी भक्ती असे

वीणावादन दिव्य स्वरांनी
अशी शांतता लाभतसे
मुखी प्रसन्न आभा पसरे
मंद हास्यही विलसतसे

ब्रह्मदेवाच्या सृष्टीमधली
दूर केली तू अपूर्णता
नदी वाऱ्याला अन सृष्टीला
मानवा दिधली तू पूर्णता

वाणी नसता शब्दहीन हे
सारे अवकळले होते
आनंदाचे शब्द पखरले
तुझ्या निर्मितीने होते

नामरूप तव भिन्न भारती
शतरूपा तू वीणावादिनी
वागेश्वरी वाग्देवी शुक्ला
वेदवती तू मंजुभाषिणी

मेधासुक्तातून कीर्ती ही
वेदांमध्ये गायली गे
उपनिषदांच्या पुराणांच्याही
पानांवर तू राहिली गे

पशूस मानव करण्यासाठी
तुझी कास ही धरणे माते
वाणी ज्ञानाविना न किंमत
अमूल्य जीवन तुझ्यासवे

ऋतुराजाच्या वसंत स्वागती
तुझी पूजा ही घडते ना
सौंदर्याच्या आधाराला
ज्ञानचांदणे पडते ना

संगीताने वसंत भुलतो
ज्ञानकलासाहित्यही फळू दे
म्हणून शारदे वरदे ज्ञानदे
मज दान हे सारे मिळू दे

नमन अखंडित करते तुजला
आराधना तव सफल होऊ दे
संगीतकला अन साहित्याच्या
कृपावर्षावी चिंब होऊ दे
वर दे शारदे, वर दे शारदे

दि.१६/०२/२१ वसंत पंचमी
सकाळी ९.३३ वा.



## (४८)
## गुरू म्हणजे सर्ग

गुरू म्हणजे सर्ग आहे
गुरू निसर्गचि आहे
गुरू तत्त्व हे महान
लीन व्हावे नित्य सान

जे जे शिकावे जिथून
तोतो चेतनाचेतन
गुरू जाणावा कृपाळू
त्याचे नित्य हो चिंतन

असो कठीण प्रसंग
दावी मार्ग सरलतम
दिशा दाखवी माऊली
गुरू सुखाची साऊली

ज्ञान तत्त्व देहधारी
गुरू होतो की साकारी
हित मनी वसे त्यांच्या
गुरू नाती सारीसारी

रूप ईश्वराचे तेच
लौकीचाची पुण्यगाठ
अलौकिक तेज वाहे
गुरुमुखी नित्य लाट

असे मिळाया गुरुही
किती जन्म सुकृतांचे
पायी वाहीन मी चित्त
मन भावपुष्प यांचे

जीव शिवाच्या मेलना
आदिकारण गुरुच
जन्म सार्थकी करण्या
जावे शरण गुरुच

दि.०५/०७/२०२०
सकाळी ०९.३१ वा.

## (४९)
## योगा मानले जगाने

नाना शास्त्रे विकसित
माझी पुण्यभू भारत
इथे ऋषी मुनी सारे
वैज्ञानिक ते प्रगत

वेद जाणले हो त्यांनी
वेदनेची नि उत्तरे
ज्ञान तपाचे ते फळ
उच्च प्रतिभा अत्तरे

ऐशा ऋषीजनांचे हो
फिटती ना उपकार
किती लोटती युगेही
ज्ञान प्रवाह उदार

त्यात योग शास्त्र एक
मुनी पतंजली सार्थ
चित्त वृत्ती निरोधाचे
सूत्र जगकल्याणार्थ

योगा मानले जगाने
राष्ट्र ख्याती पसरली
दूर तनाच्या ह्या व्याधी
मन चित्त सुधारली

आज जग नमले हे
भारताच्या ज्ञानापायी
रमू लागलेत सारे
योग्य योगाच्या उपायी

दि.२१/०६/ २१
रात्री १०.३१वा.



## (५०)
## मंजूषा

जगणे असते नितांत सुंदर
नवीन मी प्रत्यूषा
नव्या विचारे घडवत जाते
नक्षीदार मंजूषा

जतन करावे माझ्यामध्ये
मौलिक आभूषणा
रत्न गुणांचे ठेव ठेवुनी
ठरते कुलभूषणा

पुंजी जीवनभराची माझ्या
मातपित्यांची ठरते
अशी कन्यका गुणी निपजली
मन सार्थ भावाने भरते

उच्चविद्या विभूषिता अन
वक्तृत्वाची धनी
साहित्याची असे शारदा
प्रसन्न लिहिण्यावरी

अन्नपूर्णा लक्ष्मी शारदा
वरदा ठरती सदा
उत्साहाच्या राशी भरल्या
संस्कृतची संपदा

अभिमान मी ठरते जेव्हा
कृतार्थ वाटे सारे
माय मराठी उधळून देते
शब्दसुरेल धुमारे

ध्येय जीवनाचे हे उदात्त
देशधर्माची सेवा
साहित्याच्या अविरत रचना
मंजूषेचा ठेवा

दि.२५/०६/२१
सकाळी ०९.२१ वा.



भाषा माझ्या ओठांवरती
सजून त्या बसतील
अंतरातले गुज मनीचे
स्मितपणे हसतील

इकडून तिकडे अनुवादाचे
सेतू मी बांधीन
भाषा सुंदर विचार मौलिक
सहजी मी सांधीन

वक्तव्याच्या चांदण्यातुनी
रसिकवरांनी भिजावे
प्राजक्ताचे ओघळणारे
सुधामृत प्राशावे

शिकवीन ऐसे तल्लीनतेने
जन्म पुरे ना होई
ज्ञानदीप उजळून तेवतील
मुखी शारदा माई

मी जातांना परलोकाला
चरित्र येथे ठेवीन
शब्दाशब्दांमधून माझी
पदचिन्हे उमटवीन

दि.२५/०७/२१
सकाळी ०८.५८ वा.

## (५१)
## चरित्र

चरित्र माझे घडवीन ऐसे
जगताला कौतुक
कार्य एवढे सोडीन मागे
हे विश्व होई उत्सुक

साहित्याच्या प्रांतामध्ये
लहरून मी फडकेन
शब्दांमधल्या सखोल ऐशा
भावांतुन अडकेन



(५२)

**लाजण्याची तुझी अदा**

लाजण्याची तुझी अदा
घायाळ कितीदा मीही फिदा
चोरिशी अंगा, मनात दंगा
तरी थांबतो, मी श्रीरंगा

मोहक चेहरा लाजताना
येते कुठूनशी गाली लाली
मी रसिक तुझा, एवढेच म्हणता
प्रिया माझी गोरीमोरी झाली

पाहता पाहता मुखचन्द्रावर
दिव्य अलौकिक येई झळाळी
सौंदर्याच्या मज योग्याची
अल्लख म्हणता भरते झोळी

तू लाज लाजुनी मिटशी नयना
अनिमिष नेत्रे मी, प्राशितो तुजला
दिसते मजला लाजण्यातुनी
विश्वात तुझ्या हा साजन सजला

सारे शृंगार, सारे भाव
अवचित अबोल लज्जा नाव
मी विरघळतो, माझा ना उरतो
समर्पणाचा तुझा स्वभाव

लज्जेची तू वसने ल्येता
फुलापरी मी कोमल होतो
परागकण हे वेचून घेण्या
प्रेमकोशी मी बंदी होतो

दि. ४/७/१९
सायं ५.४५ वा



## (५३)
## शरदाचं हे चांदणं

शरदाचं हे चांदणं
प्रिये असंच राहू दे
अमृताचं वरदान
मज रोजची लाभू दे

नाहशील तुही येथे
स्वच्छ विमल प्रकाश
निशा जागवत चंद्र
कसे मोकळे आकाश

रात्र जागरण करू
चंद्र सांडतो अमृत
आज औषधांना सिद्ध
करतील वैद्यराज

खेळ मांडून आनंदे
साक्षीला निशाकर
ओंजळीत चांदण्याच्या
टपोऱ्या क्षणा भर

भर रात्रीला बहर
भावनांना की उधाण
आत संयमाला किती
बघ येतंय आधान

जमतील सखे सारे
तरी दिसशी तेजाळ
सूर छेडशील असे
गोडव्यानं ते मधाळ

संवत्सरी एकदा ही
कोजागिरी येते आणि
जीवनाच्या ओसाडल्या
रानामध्ये पाणी पाणी

कोण जागृत आहे
लक्ष्मी गं विचारते
झोळी भरण्या सुखाची
धरेवर संचारते

तूच शारद लक्ष्मी
तूच चंद्राची चांदणी
चांदण्यात मज चिंब
करशील रोज राणी

तुझ्या अमृताच्या बोला
झेलण्या गं आतुर मी
शरदाचे हे चांदणे
शतवार ये जीवनी

दि.१३/१०/१९
सकाळी ७.४५ वा.



## (५४)
## वरदान तुला तारुण्याचे

वरदान तुला तारुण्याचे
बंधन ना तुज वृद्धी वयाचे
आजही सखे तशीच आहेस
खेळ कसे लावण्याचे

कुणी अकाली दिसती जरामय
कुणी जर्जर ना सदा निरामय
तू संजीवनी किती जणांची
म्हणून कदाचित तू चिरतरुणी

शरीर कसे गं तसेच रहाते
चैतन्ये मन प्रफुल्ल वाटते
आजही तुला सौंदर्य भेटते
की सौंदर्या तू ऽऽऽऽ

डोळ्यामधुनी तेज सांडते
देहबोली तारुण्य मांडते
केशकलापही येई भरात
कृष्णरंगाचा त्याचा व्याप

ना वाकलेली, ना झुकलेली
तू ताठर तारुण्य विलास
जगण्याचा हा मंत्र सांग ना
कुठे कसा कोणाला दिलास

यौवनकांती सांडत जाशी
चालताना तू नित्य प्रिये
मन तूझे चिरतरुण आहे
हेच खरे का रहस्य बरे

कसे मनाला काबूत ठेवतेस
मीपण काय विचारु तुला
मनच सौंदर्याचे भोक्ते
तेच जपत असणार तुला

आतून डोकावून पाहणारे
मन तुझे प्रेमिक असणार
तुला जराही जरा न येवो
तेच तपस्या करीत असणार

अशीच रहा गं प्रेमा हेमा
कांती सोनचाफ्याची
मी भक्त समज की तुझा पुजारी
इच्छा रसिकवेड्याची

दि.२३/७/१९
रात्री १०.२१ वा.




## (५५)
## गुरुचरणांनी आश्रय दिधला

गुरुचरणांनी आश्रय दिधला
कणाकणांना अर्थ मिळाला
ध्यान, ज्ञान, सन्मान कळाला
अज्ञानतम घनदाट पळाला

स्थान अवर्णनीय गुरुवर्यांचे
भूतलप्रकटित देवच आमुचे
दिशा दाखवत जीवन घडविले
सत्त्वासाठी असत्या बडविले

अपराधांना पोटी घालत
पाठीवरती कौतुक थाप
गुरुच होती माता आणिक
गुरुच येथे समर्थ बाप

युगायुगांची ज्ञानपरंपरा
वसा घेत देत गुरू साकारा
शब्दब्रह्म ते चिर परात्परा
ज्ञानसुवास येई मज रुधिरा

आज नमन या गुरुराजांना
पदोपदीच्या दीपस्तंभांना
मातेपासून साऱ्या साऱ्यांना
साष्टांग प्रणाम मम अभिजनांना

दि. १६/७/१९
सायं. ५.५५ वा



## (५६)
## पुस्तक मित्रा

पुस्तक मित्रा, ज्ञान देतशी
ना मोबदला काही
आज मैत्र दिन गुलाब घेरे
पिवळे दोन तरी

खरे पाहता जिवलग दोस्ता
तूच माझा सखा
तुझ्याविना या जगतामध्ये
मी पूर्ण पोरका

लटका सारा खेळ जगाचा
कामापुरते काम
कोण करील रे तुझ्यासारखे
प्रेम अशर्त अनाम

शब्द तोडणे, वचन मोडणे
जगरहाटीचा भाग
शब्द पाळतोस, शब्दा जागतोस
तू शब्दांचा अविभाग

लोक सांगती सोबत आमची
तुला रे कायमची
कसली सोबत कसली साथ
ते स्वार्थ पाहताती

तू प्राणपणाने साथ देशी मज
शेवटच्या अक्षरा
प्रेम तुझे हे असेच अक्षर
अक्षय बलवत्तरा

नसे एकटा कधी तू असता
तू नसता मी एकाकी
तुला वगळता माणूस नच मी
काय उरेल बाकी

तू ज्ञान मी पिपासू
तू मोद मी आसू
मी शरीर तू प्राण
मी देहशब्द तू त्राण

इथून जाता येशी संगती
ज्ञानसंचिताने
पुनर्जन्म मज देई ईश्वरा
पुस्तकरूपाने

दि.२८/७/१९
रात्री.१०.५१ वा



## (५७)
## तेजदीप

तेजदीप होऊ या चला
आज अवस दिव्यांची आली हो
घासून, पुसून, उजळून त्यांना
रत्नदीप पेटवू अहो

कन्या पुत्रे दिवे वंशाचे
त्यांना सद्गुण तेज मिळो
अंधारदुर्गुण दूर पळविण्या
लख्ख प्रकाश हेची बळ मिळो

सारे सारे दिवे घेऊनी
आज तयांना लख्ख करा
आपुल्या जीवनी तम जो पसरला
प्रेरणा घेऊन ज्योत बना

तिन्ही सांजेला पाटावरती
समया निरांजन सजवू या
लामणदिवेही चमकुन उठतील
तेजप्रकाशे उजवू या

तेजाची पूजा ही संस्कृती
आपुली भारतमातेची
तमोगुणाला दूर सारण्या
सात्विक श्रावण आणण्याची

अपेयप्राशन अभक्ष्यभक्षण
भूतदयेला होते विसरून
अभय देत चला सत्त्व सांभाळू
खरा धर्म देऊ पसरून

निसर्गाशी बघा घट्ट आपुले
नाते जडते सणोत्सवातून
परंपरा खरी श्रेष्ठ आपुली
जपू तिला आपुल्या कृतीतून

शरीर दिवा हा मानून आपुला
मळभ निराशा दूर करू
ध्येयज्योत प्रज्वलित करण्या
कष्टतैल मग त्यात भरू

चला पेटवू दिवा दिव्याने
मानवदीप असे उजळू
त्यांच्या प्रकाशे सांजसमयी या
तमासही तेजात पाजळू

दि. ३१/७/१९
सकाळी ९.५१ वा.



## (५८)
## मीच नव्याने जगते

सखे खेळीन मोकळी
मन श्रावणाच्या सरी
दुःख उन्हातून बघ
सुख वाजवी बासरी

अशी सजीन धजीन
देह शृंगारून जाई
मन दागिन्यांसंवेच
अलंकारून हे जाई

बाई पूजीन पूजीन
मंगळागौर माहेरी
खेळ खेळून नांदेल
मन उनाड या दारी

नका अडवू सयांनो
माझ्या देखण्या बायांनो
आज सुसाट हे मन
झिम्मा फुगडी खेळा गो

जागरण करू जरा
सारा चैतन्याचा मळा
खणखण वाजे चुडा
उत्साहाचा गे चौघडा

मन लहान कोवळं
हुंदडू दे त्यास जरा
कुढ कुढुन सुकल्या
मनाला ग हा उतारा

घेत उखाणे सुखाचे
गोड गाराणे करू दे
सासू नणंद जावेचे
गीत तराणे भरू दे

नऊवारीत सजेन
नाकी नथ ही रुळेल
हाती चुडा भरलेला
रूप देखणे कळेल

घ्या ग जखडून मला
तरी अशी मी सुटेन
खेळ रंगता रंगता
सोन आनंदी लुटेन

ओठांतून हासू आणि
देह हलका फुलका
वय नका विचारू ग
खेळ तरुण बोलका

माझा श्रावण हा येतो
संगे सुखाला आणतो
ग्रीष्म पोळवून जाता
तोच उभारी ही देतो

असो निमित्त कोणते
माझी संस्कृती महान
तिनं ठेवलेली आहे
स्त्रीच्या हृदयाची जाण

म्हणूनच गौर ठरे
मीच मंगल होऊन
महालक्ष्मीही मीच
नवरूप ते धरून

शारदेची मेधा माझ्या
बघ मस्तकी राहते
एक खळाळती नदी
मज अंतरी वाहते

जाग जागते मी आज
मीच नव्याने जगते
पंख उघडून सारे
अशी स्वच्छंदी वागते

दि.१७/०८/२१
सकाळी ०९.०३ वा.



## (५९)
## ध्वज उन्नत फडकून जावा

नीलांबरी ऐटीत फडकू दे
भारत ध्वजा तिरंगा
आण बाण हा शान आमुची
स्वातंत्र्याच्या संगा

कधी कुणाच्या भूमीवरती
आक्रमण नाचरले
सोशिक सात्त्विक भारतीय आम्ही
मातृभूमी लेकुरे

भारतभूमी माय माऊली
पारतंत्री जखडून ती गेली
तिच्या श्वासाला करून मोकळे
पुत्र शहीद अजरामर झाले

ते ऐसे लढले रुधिर सांडले
कुणी फासावर लटकुन गेले
कुणी झेलल्या गोळ्या शरीरी
कुणी चाबुकी फटके साहिले

वीर धुरंधर लढवैय्यांनी
स्वातंत्र्याचा शेला दिधला
जपून ठेवणे कर्तव्यचि हे
महान नित हा देश आपुला

असे करुनिया भारत माते
मुक्त वीर साधले
आपुल्या देशा जपण्यासाठी
जन्म त्यांनी उधळीले

किती वेगळे तरीही एकचि
मातृभूमी सांभाळू
स्वातंत्र्याच्या गगनावरती
तेजकिरण रवी उजळू

लहर लहरू दे विहर विहरू दे
ध्वज उन्नत फडकून जावा
मनात भक्ती देशासाठी
जन्मही माझा झिजावा

दि.१५/०८/२१
अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिन



## (६०)
## तू माणूस रे भला

सहज जगशी तू आयुष्याला
जाण किती मोठी
खरी भावना मनात जपशी
काहीच न खोटी

नाती सगळी सांभाळून तू
अलिप्त तरी राहशी
परखड मत मांडून मनातील
भाव खरे सांगशी

साहाय्य करणे स्वभाव आणिक
धावून जाशी कधीही
श्वान प्रेम ते मनात रुजले
रिया मनी बघ तूही

भाऊ वहिनी पुतण्या आणिक
माता पित्यांचा आधार
जीवनात ये मनाजोगती
संगिनी तर साकार

होवो सारे स्वप्नं पुरे तव
तू माणूस रे भला
देव ठेविले नाव तुझे जे
स्वभाव ही चांगला

जन्मदिनी तुज देते शुभेच्छा
बहीण मी भावाला
ईश्वर चरणी मागेन सारे
सौख्य तुझे प्रिय मला

दि.१०/११/२१
सकाळी ०९.११ वा.



## (६१)
## पणजी आज्जी पणजी आज्जी

पणजी आज्जी पणजी आज्जी
कित्ती गोड तू
हापसुल्या आंब्याची
सोनेरी फोड तू

काम तुझे शिस्तीचे
धडे देवभक्तीचे
कामाचा फडशा
पाडशील तू
पणजी आज्जी पणजी आज्जी
कित्ती गोड तू

स्वयंपाक करतेस
रुचकर छान
हातावरचं करतेस
पूर्णची काम
घराचा पक्का ग जोड तू
पणजी आज्जी पणजी आज्जी
कित्ती गोड तू

आज तुझा वाढदिवस
आठावर पाच
माझ्यासवे तूऽऽ
चल ग नाच
शंभरीचा नारळ नक्की तू तोड
पणजी आज्जी पणजी आज्जी
कित्ती गोड तू
हापसुल्या आंब्याची
सोनेरी फोड तू

दि.०६/१२/२१
रात्री ०९.०१ वा.

## (६२)
## भारतभूची जयगीते गायिली

देशप्रेम मज मनात आहे
पोटासाठी हा धंदा
प्रजासत्तेचा दिवस आजचा
राष्ट्रध्वजाला हो वंदा

मनात भक्ती देशाची मज
देशासाठी काय करू
भारतमातेचे ऋण जन्मी
कोणत्याच मी कसे चुकवू

जिने जन्म दिधला मज आई
जिने जगविले ती मातृभूमी
तिच्या रक्षणासाठी माझ्या
अंगामध्ये वाहो धमणी

रक्त वाढवती भाज्या सगळ्या
मी माणसांना शक्ती देण्या
रोज करतो जी घडते सेवा
बलवर्धक नागरिक हो होण्या

आज तिरंग्याला मी सलामी
दिली या माझ्या भाज्यांमधुनी
गाजर आले केसर रंगी
मुळा शुभ्र पांढरा मधूनी

खाली हिरव्या भाज्या सजल्या
देशप्रेमाने टवटव झाल्या
तिरंगा माझा बघण्या साऱ्या
बालबालिका मोदे जमल्या

आनंदाची लहर उमटली
राष्ट्रभक्ती मज मनी प्रकटली
भारतभूसम भूमी ना कुठली
तिची माती मी मस्तकी लावली
भारतभूची जयगीते गायिली
जयगीते गायिली

दि.२६/०१/२०२२
रात्री १०.११ वा.

## (६३)
## हिंदू ऽऽऽऽऽ

हिंदू ऽऽऽऽऽ
तेजाचे कणखर बिंदू
शाश्वत मूल्यांचा सिंधू
उदारहृदयी सकल बंधू
जीवनदृष्टीचा छंदू
हिंदू ऽऽऽऽऽ ।।धृ।।

नानाविध संस्कृतीपरंपरा
निकोप जीवन दृष्टिकोन
पंथ संप्रदाय विचारश्रद्धा
सुमनांचा गंधू
हिंदू ऽऽऽऽऽ
तेजाचे कणखर बिंदू ।।१।।

चराचरांचे पूजन श्रद्धे
नीतिमूल्ये व्यापक तत्त्वे
सगुण निर्गुण गुण्यागोविंदे
एकमनाने नांदू
हिंदू ऽऽऽऽऽ
तेजाचे कणखर बिंदू ।।२।।

विश्वा आदर विश्वगुरु तर
जगणे त्याचे सदा श्रेष्ठतर
आदर्शाचे बहु भांडार
अतिप्राचीन या धर्मा वंदू
हिंदू ऽऽऽऽऽ
तेजाचे कणखर बिंदू ।।३।।

दि.२३/०२/२०२२
सकाळी १०.३१ वा.

## (६४)
## स्मृतिसंपदा पूर्ण भरीन

मी ज्ञानेश्वर कामसू खरोखर
धनालयातील सेवा सुंदर
एस बी आय हे कुटुंब माझे
चार जणांचे झाले ते घर

ज्येष्ठ बंधू भगिनीही येथून
सेवा देऊन झाले निवृत्त
पत्नीही मजसवे इथूनच
सेवा देऊन साथी सदोदित

आठवणी मजसवे केवढ्या
विसरू न शकेन कधीच वेड्या
आनंदाची ठरे एस बी आय
कधी न वाटली ती मज बेड्या

मनापासुनी सेवा केली
ग्राहक देवा पूजियले
वृद्ध निवृत्तीधारकांना
घरपोच सेवे तोषीयले

जीवनसाथी, घर, समृद्धी
वाहनसुख वा मुलाचे शिक्षण
दिधले मला या धनालयाने
संकटकाळी करुनी रक्षण

ग्राहक झाले मित्र जवळचे
वरिष्ठ ज्ञानी जणू गुरू
निवृत्ती ही समाधानाची
नवे जगणे मज करीन सुरू

स्वतःस सांभाळीन नेटके
देशाटन जगभ्रमण करीन
मनात माझ्या एस बी आय ची
स्मृतिसंपदा पूर्ण भरीन

दि.२६/०४/२०२२
सकाळी ०७.२० वा.
श्री. ज्ञानेश्वर मगजी यांच्या
सेवनिवृत्तीनिमित्त सस्नेह



कै.मुकुंद गोळे (ए.सी.पी)

## (६५)
## मुकुंदायन

धैर्यशील माता । साकारी जीवना ।
तिचीच ही कृपा । मुकुंदासी ।।१।।

रंजल्या गांजल्या । जनांसी तत्पर ।
सेवेची झालर । निज कर्तव्या ।।२।।

काम हेचि धाम । काम कृष्ण राम ।
काम अभिराम । कर्म गीता ।।३।।

जाच पेच सारे । कौशल्ये पिटाळे ।
प्रस्ताव उत्तरे । मुकुंद गोळे ।।४।।

कर्तव्याची निष्ठा । फळ आले कष्टा ।
सुखविती चेष्टा । अधिकारे ।।५।।

संसार नेटका । मुलं नातवंडं देखा ।
वात्सल्य पुरुष । झालो अगा ।।६।।

कर्मगाथा माझी । प्रेरक ठरावी ।
सकळ जनांसी । सार्थकता ।।७।।

जीवन दिधले । कर्तव्यासी ठेले ।
समाधान झाले । सदोदित ।।८।।

सदिच्छा शुभेच्छा । पूर्ण होवो इच्छा ।
मागते मंजूषा । ईशा पायी ।।९।।

साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त
ज्येष्ठ साहित्यिक, कवयित्री
माजी भाषासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
दि.३०/०६/२०२२
दुपारी ०३.०७ वा.

# लेखिकेचा परिचय

- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४

**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २020 प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

‘‘**साहित्यिक व्रत**’’ म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील ‘हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड’ मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक ‘विवाह संस्कार’ २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्यायः, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर ‘प्राचीन भारतीय समाज’, ‘सूर्य शक्ती और मानव’, ‘कौटिलीय अर्थशास्त्र’, ‘स्मृतीग्रंथ – भाग १ और २’ ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी–जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड–गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग–निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक) यांचा समावेश आहे. याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग–१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात – डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये ‘मंजु मंजिरी’ आणि ‘सर्ग निसर्ग’ नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(राधाकृष्ण) – रूप–स्वरूप, श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) – सृष्टीगंध, (चंद्र) – सुधांशु, (सूर्य) – दिव्यांतरी, (प्रीत – तिच्या मनातील कविता) – नादश्रुती, श्वेता, (सकाळ–संध्याकाळ) – लाघव वेळा, (वेळा) – तेंव्हा, (प्रेम – त्याच्या मनातील कविता) – प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर, (मिश्र कविता) – गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) – अलवार, मधुश्री, सहा सोहळे, (फुले) – अळुमाळु, सुरभी, (पशु) – खाणाखुणा, (पक्षी) – वैष्णवी, (स्त्रीजीवन) – स्वामिनी, मृणालिनी, (धरती–आकाश) – प्रमिला, नभ मोजताना, (जीवनपर) – मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती, (पाऊस कविता) – श्रावणी, (गझल) – उल्का, (रसिकप्रतिक्रिया – कवीश्वर) – बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) –प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) – जरा रेंगाळले, (Audio - Book) – युगंधरा, कामिनी, (रंग) – रंगतनु, (गझल) – मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) – माझी कविता, (ललितलेख) – मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री मुलाखत, दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source =whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>‘प्रकाशवाटा’ या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी ‘प्रकाशमार्गा:’ | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/ 7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com MahaGovtMic/status 1476551366352924 672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/ InfoVidarbha/status/ 1418559733921816 580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर डॉ. मंजूषा कुलकर्णी सखी सह्याद्री - डीडी सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/ VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT LxInwuJc ; https:/ youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह डॉ.मंजूषा कुलकर्णी / नवरात्री स्पेशल / सकाळ मीडिया | https://youtu.be/ m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=126653335052919 8id=100015176343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/story.php?story_fbid=4429100480484776 id=100001546044035 sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम – ‘‘सर्ग_निसर्ग’’ ऑडिओ अल्बम – ‘‘मंजुमंजिरी’’ | <https://vy6s8.app.goo.gl/NKnJ> https://vy6s8.app.goo.gl/A8Z5 |
| १८ | Special Screening of 100th Episode of Mann Ki Baat from Raj Bhavan | https://www.youtube.com/live/7-dyWQaLA?si=mid7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-Pu4dOs?si=typfHtOvNg-1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ५३
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : ५०
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

● ● ●